|| जय माता जी ||

|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ७ मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ ते रविवार दि. २ मार्च २०२५ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

नको ते नजरेस पडताच संतापाने पेटला आईच्या प्रियकराचा मुलाने जीव घेतला | ३

प्रेमसंबंधातून मुलगी गर्भवती झाली जन्मदात्या आईने तिची हत्या केली | ३

उसन्या पैशावरून दोघांमध्ये वाद झाला चिडलेल्या मित्रानेच मित्राचा खून केला | ३

पालघरमध्ये भव्य 'जय शिवाजी जय भारत पदयात्रा'तून शिवजयंती साजरी | ८

गुरु रविदासांच्या समतावादी विचारांचा धागा मनामनात रूजला पाहिजे –प्रा.डॉ.अनंत राऊत | ८

चित्र : श्री. वासुदेव कामत



भाऊ के जीवन में 'मेरी भावना' का प्रभाव था अपार; वे कहते, 'मिला जन्म दोबारा तो पाऊ इन्ही सिद्धांतों का आधार!'

जिसने राग-द्वेष कामादिक, जीते सब जग जान लिया।
सब जीवों को मोक्ष-मार्ग का, निःस्पृह हो उपदेश दिया॥
बुद्ध, वीर, जिन, हरि हर ब्रह्मा, या उसको स्वाधीन कहो।
भक्तिभाव से प्रेरित हो यह, चित्त उसी में लीन रहो॥

विषयों की आशा नही जिनके, साम्य-भाव धन रखते हैं।
निज-पर के हित-साधन में जो, निश-दिन तत्पर रहते हैं॥
स्वार्थ-त्याग की कठिन तपस्या, बिना खेद जो करते हैं।
ऐसे ज्ञानी साधु जगत के, दुख-समूह को हरते हैं॥

रहे सदा सत्संग उन्हीं का, ध्यान उन्हीं का नित्य रहे।
उन्हीं जैसी चर्या में यह, चित्त सदा अनुरक्त रहे।
नहीं सताऊ किसी जीव को, झूठ कभी नहीं कहा करूँ।
परधन-वनिता पर न लुभाऊ, संतोषामृत पिया करूँ॥

अहंकार का भाव न रक्खूँ, नहीं किसी पर क्रोध करूँ।
देख दूसरों की बढ़ती को, कभी न ईर्ष्या-भाव धरूँ॥
रहे भावना ऐसी मेरी, सरल-सत्य व्यवहार करूँ।
बने जहाँ तक इस जीवन में, औरों का उपकार करूँ॥

मैत्री-भाव जगत में मेरा, सब जीवों पर नित्य रहे।
दीन-दुखी जीवों पर मेरे, उर से करुणा-स्रोत बहे॥
दुर्जन-क्रूर-कुमार्गरतों पर, क्षोभ नहीं मुझ को आवे।
साम्यभाव रक्खूँ मैं उन पर, ऐसी परिणति हो जावे॥

गुणीजनों को देख हृदय में, मेरे प्रेम उमड़ आवे।
बने जहाँ तक उनकी सेवा, करके यह मन सुख पावे॥
होऊ नही कृतघ्न कभी मैं, द्रोह न मेरे उर आवे।
गुण-ग्रहण का भाव रहे नित, दृष्टि न दोषों पर जावे॥

कोई बुरा कहे या अच्छा, लक्ष्मी आवे या जावे।
लाखों वर्षों तक जीऊ, या मृत्यु आज ही आ जावे॥
अथवा कोई कैसा ही भय, या लालच देने आवे।
तो भी न्याय-मार्ग से मेरा, कभी न पद डिगने पावे॥

होकर सुख में मग्न न फूलें, दुख में कभी न घबरावें।
पर्वत-नदी-श्मशान भयानक, अटवी से नहीं भय खावें॥
रहें अडोल अकम्प निरंतर, यह मन दृढ़तर बन जाये।
इष्ट-वियोग अनिष्ट-योग में, सहनशीलता दिखलावें॥

सुखी रहें सब जीव जगत के, कोई कभी न घबरावें।
वैर पाप अभिमान छोड़ जग, नित्य नये मंगल गाये॥
घर-घर चर्चा रहे धर्म की, दुष्कृत-दुष्कर हो जाये।
ज्ञान-चारित्र उन्नत कर अपना, मनुज-जन्म फल सब पावें॥

ईति भीति व्यापे नही जग में, वृष्टि समय पर हुआ करें।
धर्मनिष्ठ होकर राजा भी, न्याय प्रजा का किया करें॥
रोग, मरी, दुर्भिक्ष न फैले, प्रजा शान्ति से जिया करें।
परम अहिंसा धर्म जगत में, फैल सर्व हित किया करें॥

फैले प्रेम परस्पर जग में, मोह दूर पर रहा करें।
अप्रिय-कटुक-कठोर शब्द नहीं, कोई मुख से कहा करें॥
बन कर सब 'युग वीर' हृदय से, देशोन्नति रत रहा करें।
वस्तु स्वरूप विचार खुशी से, सब दुख संकट सहा करें॥

श्रद्धेय भवरलालजी जैन इन्हें श्रद्धावंदन दिवस पर कृतज्ञतापूर्वक प्रणाम...

जन्म : १२ दिसंबर १९३७ निर्वाण : २५ फरवरी २०१६

JAINART/022025

भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाउंडेशन www.bkjfoundation.org
कांताई नेत्रालय अँडव्हान्स्ड आय केअर
JAIN HEALTH CARE SERVICES
eye care opticals
जैन स्पोर्ट्स अकॅडमी
भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी
जैन इरिगेशन सिस्टम्स् लि. छोटे छोटे कदम. आसमाँ छुनेका दम. www.jains.com
भवरलालजी एवम् कांताई जैन परिवार www.bhavarlaljain.in
जैन फार्म फ्रेश फुड्स् लि. आपकी पाकविधी रसना की तुष्टी। www.jainfarmfresh.com
अनुभूति स्कूल www.anubhutischool.in
गौराई कृषी-तंत्र निकेतन
गौराई ग्रामोद्योग
बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट
गांधी रिसर्च फाउंडेशन • सत्य • अहिंसा • शांती www.gandhifoundation.net

24 FEBRUARY TO 02 MARCH 2025 - Page 2 (CRIME SANDHYA)_Layout 1 24-02-2025 16:27 Page 1

नैतिकता गेली चुलीत!

ज्या क्षेत्रात खोटे बोलने, फसवेगिरी करणे, लुबाडनुक करणे, कोणत्याही मार्गाने निवडणुका जिंकून सत्तेमध्ये जाणे हेच प्रमुख निकष आहेत. त्या क्षेत्राबाबत नैतिकतेची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे? पण तरीसुद्धा काही लोक राजकारणांकडून नैतिकतेची अपेक्षा करतात. एक काळ असा होता की राजकारण्यांमध्ये नैतिकता होती. म्हणून तर रेल्वे अपघातानंतर तात्कालीन रेल्वे मंत्री लालबहादूर शास्त्री यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. आजच्या मंत्रांवर दरोड्याचे भ्रष्टाचाराचे, बलात्काराचे, जनतेला धमकावण्याचे किती जरी आरोप झाले, तरी कोणीही नैतिकता दाखवून आपल्या पदाचा राजीनामा देत नाही. किंवा जो कोणी मुख्यमंत्री असतो त्याच्याकडेही नैतिकता नसल्याने तोही अशा भ्रष्ट मंत्राला किंवा गुन्हेगार मंत्राला आपल्या मंत्रिमंडळातून काढून टाकत नाही. महाराष्ट्रापुरतं बोलायचं झाल्यास सध्या सरकारमधील दोन मंत्र्यांवर राजीनामासाठी प्रचंड दबाव आहे. त्यापैकी धनंजय मुंडे यांच्यावर तर हत्येच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्या आणि खंडणी प्रकरणात सध्या तुरुंगवासात असलेल्या आरोपीची पाठराखण केल्याचा आरोप आहे. परंतु अनेक वेळा त्यांच्या राजीनाम्याची मागणी होऊन सुद्धा ते राजीनामा द्यायला तयार नाहीत. कारण त्यांचे जे कोणी नेते आहेत त्यांना धनंजय मुंडे गुन्हेगार वाटत नाहीत. जोपर्यंत त्यांच्यावरचे आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत त्यांचा राजीनामा घेणे योग्य ठरणार नाही असं त्यांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. ठीक आहे धनंजय मुंडे यांच्यावरअसलेले आरोप सिद्ध झाले नाहीत म्हणून ते राजीनामा देऊ शकत नाहीत. हे जरी एक वेळ खरे मानले, तरी मग कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे काय ?त्यांना तर भ्रष्टाचाराच्या प्रकरणात न्यायालयाने दोषी ठरवून दोन वर्षाची शिक्षा आणि पन्नास हजाराचा दंड ठोठावला आहे. मात्र तरीही ते राजीनामा द्यायला तयार नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे नैतिकतेच्या गप्पा मारणारे भाजपवाले आज सत्तेत आहेत पण त्यांनाही माणिकराव कोकाटे दोषी असल्याचे वाटत नाही. न्यायालयाने दोषी ठरवले तरीही जर सत्ताधारी पक्षातल्या मोठ्या नेत्यांना कोकाटेंचा राजीनामा घ्यावासा वाटत नसेल, तर मग कोकाट्याने आणखी काय करायला हवे होते? म्हणजे त्याचा राजीनामा घ्यावा असे मुख्यमंत्र्यांना वाटेल. अर्थात मुख्यमंत्र्यांबाबत अशा कोणत्याही अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरेल. कारण हेच मुख्यमंत्री विरोधी पक्षात असताना त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांच्या विरुद्ध आपल्याकडे गाडीभर पुरावे आहेत असे सांगत होते. आज कुठे गेली त्यांची ती गाडी आणि कुठे गेले त्यांचे ते पुरावे? हे लोकअसेच असतात. म्हणून त्यांच्यावर लोकांचा विश्वास नसतो. परिणामी चांगले सुशिक्षित घरंदाज, विचारवंत व बौद्धिक दृष्ट्या सक्षम असलेले लोक राजकारणात येत नाहीत. लोकशाहीची हीच मोठी शोकांतिका आहे. माणिकराव कोकाटे न्यायालयात दोषी ठरून सुधा जर मुख्यमंत्री त्यांचा राजीनामा घेणार नसतील, तर कुठल्याही राजकारणावर भविष्यात कसलेही आरोप झाले तरी त्याचा राजीनामा मागण्याची सोय उरणार नाही. वास्तविक न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा स्वतःहून द्यायला हवा होता. पण तेवढे जर ते प्रामाणिक असते तर राजकारणात आलेच नसते. किंवा त्यांचे जे कोणी नेते आहेत ते सुद्धा त्यांच्यासारखेच असल्यामुळे, माणिकराव कोकाटे यांचा दोष त्यांना दिसत नाही. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा ते घेऊ शकत नाहीत.आणि कुठल्या तोंडाने घेतील, ते स्वतःही तसेच आहेत. त्यांच्यावरील वेगवेगळ्या प्रकारचे भ्रष्टाचाराचे आरोप झालेत. मग जे लोक स्वतःच वेगवेगळ्या प्रकरणात आरोपी आहेत त्यांना दुसऱ्याचा राजीनामा घेण्याचा अधिकारच नाही. धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्या विषयी बोलताना, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी नुकतेच एक विधान केलेले आहे. त्यांनी म्हटले आहे की ज्या मंत्र्यांवर आरोप झालेले आहेत त्यांनी स्वतःहून मंत्री पदाचा राजीनामा द्यायला हवा. अण्णा आयुष्यभर भ्रष्टाचाराविरुद्ध लढले. पण दुर्दैवाने त्यांच्याही चेल्या चपाट्यानीच अण्णांच्या भ्रष्टाचार विरोधी मोहिमेला सुरुंग लावला. त्यात केजरीवाल सारखे त्यांचे चेले तर बदनाम झालेच. पण त्या बदनामीचे शिंतोडे अण्णांच्याही धोतरावर उडाले. त्यामुळे आता अण्णांनी राजकारण्यांना नैतिकता शिकवण्याच्या भानगडीत पडू नये. उतार वयात राळेगणसिद्धीत उरलेलं आयुष्य शांतपणे जगावे. कारण भ्रष्टाचारी लोक स्वतः तयार होत नाहीत. त्यांना जनताच तयार करते. भ्रष्टाचारी लोकांच्या मागे जेव्हा जनता भरकटत जाते, तुरुंगातून भ्रष्टाचारी नेता जामिनावर बाहेर आल्यावर जेव्हा लोक त्यांची मिरवणूक काढतात, तेव्हा जनतेला भ्रष्टाचाराच्या विरुद्ध बोलण्याचा अधिकारच राहिलेला नसतो. ही परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. त्यामुळेच माणिकराव कोकाटे सारखे नेते भ्रष्टाचाराच्या प्रकरणात न्यायालयात दोषी ठरले तरीसुद्धा राजीनामा द्यायला तयार नाहीत. त्याचबरोबर त्यांच्या मतदारसंघातील ज्या लोकांनी त्यांना निवडून दिलेले आहे, ते लोक सुद्धा कोकाट्यांचा राजीनामा मागायला तयार नाहीत. हे सगळं भयंकर आहे .राजकारणी आणि राजकारणाची वाटचाल दिवसेंदिवस हुकूमशाहीच्या दिशेने सुरू झाली आहे. त्यांना आता रोखणे कठीण आहे. जोवर भ्रष्टाचारी नेत्यांच्या अवतीभवती बिनडोक अंधभक्तांची फौज आहे. तोपर्यंत धनंजय मुंडे किंवा माणिकराव कोकाटे यांच्यासारख्या नेत्यांना कुणाचेही भय राहणार नाही. ते राजकारणात कालही होते, आजही आहेत आणि भविष्यातही राहतील. काल-परवापर्यंत ते जनतेचे ऐकत नव्हते. आता न्यायालयालाही जुमानायला तयार नाहीत. आणि इथेच लोकशाहीची घटका भरली असे म्हणायला हरकत नाही. विधानसभा निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले की निवडणुका कशा जिंकल्या जातात. जर निवडणुका भ्रष्ट मार्गाने जिंकल्या जात असतील, तर भ्रष्ट मार्गाने निवडून येणाऱ्या नेत्याने सत्तेत राहून भ्रष्टाचार केल्यास कुठे बिघडले? त्यामुळे लोकांनी आता भ्रष्टाचारावर बोलण्याएवजी, राजकारण्यांची गुलामी निमुटपणे स्वीकारावी. आणि त्यांची मनमानी सहन करावी. लोकशाही वगैरे आता काही राहिलेले नाही. आपण सर्व राजकारण्यांच्या हुकूमशाही मध्ये जगतोय हेच लक्षात ठेवून गप्प राहावे. त्यातच आपले आणि आपल्या कुटुंबाचे भले आहे.

ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणा...

दिल्ली येथे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान होत आहे. मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन आहे. अशा या विशेष संमेलनानिमित्त मराठी भाषेतील ग्रामीण साहित्य निर्मितीचा धांडोळा घेणारा हा लेख...

ग्रामीण साहित्याची निर्मिती ही ग्रामीण संवेदनशीलतेतून झाली. सातवाहन राजा हाल यांच्या 'गाथासप्तशती' या सारख्या ग्रंथात ग्रामीण जीवनाच्या काही छटा प्रकट होताना दिसतात. याशिवाय मध्ययुगीन महानुभाव, वारकरी वाङ्मय, म्हाइंभट्टाचा 'लिळाचरित्र,' 'गोविंदप्रभुचरित्र' केशिराजबासांचा 'दृष्टांतपाठ' या सारख्या महानुभाव वाङ्मयात ग्रामजीवनाचे दर्शन घडते तसेच संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत सावतामाळी, संत गोरोबा कुंभार, संत चोखामेळा, संत तुकाराम, संत एकनाथ आदी व इतर संताच्या अभंग, गौळणी व भारूडादी काव्य प्रकारातून ग्रामीण संस्कृतीचे सुक्ष्म व प्रभावी प्रकटीकरण दिसून येते.मराठी काव्याची 'प्रभात' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहिरी कवनातही ग्रामीण रांगड्या श्रृंगाराचे, ग्राम संस्कृतीचे भावप्रकटीकरण दिसून येते. परंतु उपरोक्त साहित्यलेखनकर्त्याचा लेखन हेतू, प्रेरणा भिन्न स्वरूपाच्या दिसून येतात. लोकसाहित्य हे श्रमिक कष्टकऱ्यांच्या रंजनासाठी, महानुभाव साहित्य पंथनिष्ठेतून उदय पावले, वारकरी साहित्य समाजप्रबोधन व अध्यात्मनिरूपणाच्या प्रेरणेतून तर शाहिरी वाङ्मय हे लोकरंजनाच्या हेतूतून उगम पावले. या साहित्य कलावंताच्या कलाकृतीतून ग्रामजीवनाच्या विविध छटा प्रकट होत असल्या तरी ग्रामजीवनाचे विविध प्रश्न, समस्या केंद्रीभूत मानून साहित्य लेखन करावे असे त्यांना वाटलेले दिसत नाही. कदाचित त्या काळाचा विचार करता ग्रामीण समाज जीवनाच्या व्यथा, वेदना आणि समस्या यांच्या अनुषंगाने आवश्यक असणारी शिक्षणप्रणाली व समाजप्रबोधनाची चळवळ झालेली नव्हती. ग्रामीण साहित्याला महात्मा फुले, राजर्षी शाहू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, शरद जोशी यांच्या विचाराचे अधिष्ठान आहे.ग्रामीण संवेदनशीलतेचा आणि जाणीवेचा प्रारंभ आपणास महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्यात सापडतो. महात्मा फुले यांनी 'तृतीयरत्न' नाटक (१८५५) 'ब्राम्हणाचे कसब' (१८६९), 'गुलामगिरी' (१८७३), 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३), 'मराठी ग्रंबकार सभेस पत्र' (१८८५), 'इशारा' (१८८५), 'अखंडादी काव्यरचना' (१८८७) इ. ललित आणि वैचारिक स्वरूपाचे लेखन केलेले दिसते. शेतकरी, कष्टकरी व शुद्रादीशुद्रांच्या संबंधी काही मुलगामी विचार मांडून त्यांच्या दारिद्र्याचा, गरिबीचा अन्वयार्थ त्यांनी शोधला. शेतकऱ्यांच्या दयनीय स्थिती व दाहकतेचे वर्णन करताना महात्मा फुले यांची ग्रामीणतेसंबधी प्रगल्भ जाणीव प्रकट होते.

कृष्णराव भालेराव यांनी १८७७ मध्ये 'दीनमित्र' च्या अंकात 'बळीबा पाटील' ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीतून खेडुतांचे होणारे शोषण आणि दाहकता यांचे वास्तवदर्शी चित्र रेखाटले आहे. पाटील, कुलकर्णी, अस्पृश, मुसलमान यांच्या संबंधासह वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था व स्त्रियांचे स्थान यावर प्रकाश टाकते. हरिभाऊ आपटे यांनी १८९८ च्या दरम्यान लिहिलेली 'काळ तर मोठा कठीण आला' ही दीर्घकथा १८९७ च्या सुमारास महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळ स्थितीवर आधारलेली आहे. 'धनुर्धारी (श्री. रा. वि. टिकेकर) यांनी १९०३ मध्ये 'पिराजी पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी लिहिली.१९२० च्या सुमारास भारतीय राजकारणाची सूत्रे महात्मा गांधी यांच्याकडे गेली. राजकारणी, समाजसुधारक, विचारवंत व साहित्यिक यांनी खेड्यात जाऊन तेथील समाजाचा जीवनानुभव समजावून घेतला पाहिजे, ही भूमिका त्यांनी मांडली. आपल्या अनुयायांना 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली. गांधीजींच्या हाकेने संमोहित होऊन माधव त्र्यंबक पटवर्धन, यशवंत दिनकर पेंढारकर, ग. त्र्य. मांडखोलकर, श्री. बा. रानडे इत्यादी मंडळीनी १९२३ मध्ये 'रविकिरण मंडळा' ची स्थापना केली याच काळात हळुहळू ग्रामीण जीवनातील साहित्यामध्ये आस्था आणि जिव्हाळा निर्माण झाला. त्याचे पर्यावसान ग्रामीण कविता लिहिण्यात झाले.गिरीश, यशवंत, ग. ल. ठोकळ, ना. घ. देशपांडे, मा. भि. पाटील, के. नारखेडे यांच्या जानपद गीतांना चांगलीच लोकप्रियता मिळाली. १९३३ साली 'सुगी' हा प्रतिनिधीक जानपदगीत संग्रह प्रकाशित झाला. १९३४ साली ग. ह. पाटलाचा 'रानजाई', ग. ल. ठोकळ यांचा 'मीठभाकर' (१९३८), के. नारखेडे 'शिवार' (१९३९), भा. रा. तांबे 'गुराख्याचे गाणे,' गिरीशांचे 'आंबराई,' चंद्रशेखराचे 'काय हो चमत्कार' हे खंडकाव्य दरम्यानच्या काळात प्रसिध्द झाले. तथाकथित ग्रामीण साहित्याचा निर्माता आणि भोक्ताही शहरी मध्यमवर्गीय समाज होता. म्हणून एक रूचीपालट म्हणून ग्रामीण जीवनाला साहित्यात स्थान दिले गेले. या संदर्भात आनंद यादव म्हणतात की, हौसेखातर नागर मुलीने खेड्यातल्या मुलीचा पोशाख घटकाभर धारण करावा आणि मिरवावा तसा हा केवळ बदलाचा एक नवा प्रकार म्हणूनच ही कविता आरंभी जन्माला आली. या काळात सर्वच वाङ्मय प्रकारात विपूल साहित्य निर्मिती होतांना दिसते. ही आनंददायी बाब असली तरी या काळात ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्र प्रकट झाले का? या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. या कालखंडातील अपवाद म्हणून श्री. म. माटे यांचा विचार करावा लागेल. त्यांनी लिहिलेल्या 'उपेक्षितांचे अंतरंग' व 'माणूसकीचा गहिवर' या संग्रहातून आलेल्या कथा ही ग्रामीण, दलित, उपोक्षितांच्या व्यथा, वेदनांचा छेद अंतरिच्या उमल्यातून येतांना दिसतात. या अर्थाने माटे यांना 'ग्रामीण कथेचे जनक' म्हणतात.१९४५ च्या नंतर एकूणच मराठी साहित्यात संक्रमण सुरू झाले. हा काळ मराठी ग्रामीण साहित्याच्या दृष्टीनेही परिवर्तनाचा काळ आहे. या काळात उदयास आलेली नवकाव्य, नवकथा हे मराठी साहित्याला वास्तवतेच्या पातळीवर आणू पाहत होते. परिणामतः ग्रामीण साहित्य रंजनपरतेची कात टाकून ग्रामीण वास्तवतेच्या अविष्करणाला महत्व देऊ लागते. मर्ढेकरांनी नवकाव्याबरोबर साहित्याच्या मूल्यांची भूमिका कलावादी जाणीवेतून मांडली. आपल्या निष्ठा आणि शुध्द कलावादी भान गंगाधर गाडगीळ, गोखले, पु. भा. भावे नव्या जोमाने कथा लेखनाद्वारे मांडीत होते. या लेखनाचा आणि दृष्टीचा ताजा जोम आणि पीळ व्यंकटेश मांडगुळकरांच्या 'माणदेशी माणसे' नी शिल्पीत झाला. मांडगुळकर, द. मा. मिरासदार, रणजित देसाई, अण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, श्री. ना. पेंडसे आदीचे लक्षणीय लेखन राहिले. विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' (१९५०) या कादंबरीने समाजापासून वंचित असणाऱ्या मांग-गारूडी या जमातीच्या जीवनातील अंधश्रध्दा, निरक्षरता जोपासणारी, माणसाचा दिशाहिन पट अतिशय प्रगल्भपणे या कांदबरीत मांडली. बहिणाबाई चौधरी यांचा 'बहिणाबाईची गाणी' (१९५२) हा अस्सल ग्रामीण संवेदनशीलतेचा ठेवा सापडला. लोकगीताच्या अंगाने कृषीसंस्कृतीचे अनेकविध धागे सहजपणे त्यांनी साकारले.

दरम्यानच्या काळात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे खेड्यातील नवशिक्षितांची पिढी उदयाला आली आणि आपले अनुभव शब्दात मांडू लागली. यालाच 'साठोत्तरी साहित्य' हो संज्ञा रूढ केली गेली, या पिढीने ग्रामीण जीवन प्रत्यक्ष अनुभवले होते. त्यामुळे त्याच्या लेखनातून अनुभूतीच्या खुणा प्रकट होतांना दिसतात त्यांना आत्मभान आले होते. या काळातील ग्रामीण साहित्य अस्सल ग्राम बास्तवाच्या निकट जाताना दिसते. यातूनच अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा', उध्दव शेळके 'धग', हमीद दलवाई 'इंधन', शंकर पाटील 'टारफूला', ना. धो. महानोर 'गांधारी', आनंद यादव 'गोतावळा', रा.रं. बोराडे 'पाचोळा' या कांदबऱ्या लक्षणीय स्वरूपाने आलेल्या दिसतात. ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात द. ता. भोसले, म. भा. भोसले, ग. दि. मांडगुळकर, शंकरराव खरात, नामदेव व्हटकर, मधु मंगेश कर्णिक, चंद्रकांत भालेराव, वा. भ. पाटील, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, सखा कलाल, चारुता सागर यांच्या शिवाय अनेक साहित्यिक अधूनमधून ग्रामीण लेखन करतांना दिसतात, या काळात ग्रामीण साहित्याने संख्यात्मक व गुणात्मक उंची गाठलेली दिसते. पण ही पिढो ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडताना स्वतःच्या अनुभवाशी रेंगाळताना दिसतात.समूहाचे जगणे, सामाजिक प्रश्न-समस्या त्यांच्या साहित्यातून येईनाश्या झाल्या.

व्यक्तीजीवन, कुटुंबजीवन, नाते संबंध यांच्या मोहात अडकले. १९७७ पासून सुरू झालेल्या ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण साहित्याला नवी दृष्टी आणि अस्मिता दिली, तसेच या काळात ग्रामीण साहित्याच्या स्थित्यंतराबाबत एक अतिशय आश्वासक घटना घडली ती म्हणजे शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचा उदय ही होय. 'भीक नको घेऊ घामाचे दाम' हा शेतकरी संघटनेने कष्टकरी शेतकरी समूहाला दिलेला स्वाभिमानी मंत्र त्यांच्या ठायी 'आत्मभान' निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरला. शेतकऱ्याचे प्रश्न आणि त्यासाठी उभी राहणारी आंदोलने ग्राम आत्मभानासाठी पूरक असल्याची भूमिका चंदनशिव व्यक्त करतात. शेतकऱ्यांच्या शोषण परंपराची नोंद घेऊन शेषराव मोहिते, विठ्ठल वाघ, भास्कर चंदनशिव, श्रीराम गुंदेकर, नागनाथ कोतापल्ले, वासुदेव मुलाटे, फ. म. शहाजिंदे, बाबाराव मुसळे, महादेव मोरे, भिमराव वाघचौरे, मोहन पाटील, इंद्रजित भालेराव, संदानंद देशमुख, रा. रं. बोराडे, आनंद यादव, विश्वास पाटील, प्रभाकर हारकळ, राजन गवस, पुरुषोत्तम बोरकर, बा. ग. केसकर, आनंद पाटील, श्रीकांत देशमुख, नागनाथ पाटील, जगदीश कदम, भारत काळे, आसाराम लोमटे, सुरेंद्र पाटील, प्रकाश मोगले, अप्पासाहेब खोत, नारायण सुमंत, प्रकाश होळकर, गणेश आवटे, अशोक कोळी, कृष्णात खोत, भगवान ठग, उत्तम बावस्कर, केशव देशमुख, उत्तम कोळगावकर, भास्कर बडे, लक्ष्मण महाडिक, प्रमोद माने, बालाजी इंगळे, सुधाकर गायधनी, संतोष पवार, कैलास दौंड, नामदेव वाबळे, हंसराज जाधव इत्यादी (अजूनही काही नावे सांगता येतील) साहित्यिक ग्रामजीवन प्रगल्भ जाणीवेसह मांडताना दिसतात. या कालखंडात लिहिणाऱ्या साहित्यिकांना 'समाजभान' आल्याचे जाणवते. त्यांनी ग्रामजीवनाचे मानसिक आंदोलनाचे, जगण्याचे प्रश्न नीट नेटकेपणाने आकलन करून घेतले. ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या कार्याची गती आणि व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. वातानुकूलीत महालात बसून शोषक व्यवस्थेचे भौतिक सुख उपभोगून शाब्दिक सहानुभूतीच्या लेखनाचा प्रभाव सामान्य जनतेवर पडत नाही. जो साहित्यिक कलावंत जनतेच्या व्यथावेदना, मानसिक आंदोलन, आकांक्षा, सुख दुःखांना लेखणीत मुखरीत करतो. ते साहित्य खऱ्याअर्थाने विश्वव्यापी रूप धारण करते. मुळात ग्रामीण साहित्याजवळ प्रतिभावंतांची वाणवा नाही. उलटपक्षी वैश्विकतेकडे जाण्याचे सर्वाधिक सामर्थ्य ग्रामीण साहित्यातच आहे, हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. तिची बांधिलकी कष्टकरी, श्रमिक व सर्जक मानवतेशी आहे. जोपर्यंत ग्रामीण कष्टकऱ्यांची संस्कृती अस्तित्वात आहे तोपर्यंत ग्रामीण साहित्याला भवितव्य आहे, यामध्ये कसलाही संदेह नाही.

– डॉ. ज्ञानदेव राऊत,
शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी
मोबाईल नंबर ९४२१४८५३८६

मराठी मनाचा ठाव घेणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी

महाराष्ट्रातील अनेक कवींनी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. ग्रामीण मराठी बोलीभाषेतील कविता अंतर्मनाला स्पर्श करून जातात अशाच काही कविता बहिणाबाई चौधरी यांनी रचल्या आहेत. खानदेशातील एका शेतकरी कुटुंबात बहिणाबाईंचा जन्म झाला, पाटीपुस्तकाचा तर सोडाच, पण अक्षराचाही गंध नसलेल्या बहिणाबाईंचा दिवस, उगवल्यापासून मावळेपर्यंत काळ्याभोर जमिनीच्या सान्निध्यात जात असे, या 'काळ्या आईच्या कुशीतच त्या वाढल्या, त्यांचे व्यक्तिमत्त्वही त्या काळ्या आईनेच घडविले. तिच्याजवळ त्या आपली सगळी सुखदुःखे बोलत, सरस्वतीचा त्यांच्यावर जणू वरदहस्तच होता, त्यामुळे त्यांचे साधे बोलणेही गाणे होत असे. अशा अनेक गाण्यांच्या रचना त्यांनी केल्या आहेत, बोलीभाषेच्या लडिवाळपणामुळे बहिणाबाईंची गाणी अधिक मधुर वाटतात. बहिणाबाईच्या कविता खानदेशातील त्यांच्या मातृबोलीत, रचलेल्या आहेत. त्यांच्या कवितांचे विषय माहेर, संसारः शेतीची साधने, कापणी, मळणी इत्यादी कृषिजीवनातील विविध प्रसंग: अक्षय्य तृतीया, पोळा, पाडवा इत्यादी सणसोहळे या आणि इतर त्यांच्या कवितांचे विषय असत. बहिणाबाईंच्या रचलेल्या कविता मध्ये जागोजागी जीव, जातींचा उल्लेख आलेला असून या मध्ये, खीरा, भीमफूल, गोंडंबा, सागरगोटे, ढोर, इचू, साप, कपाशी, गाय, बोरी, वाभई, पळस, सुगरण या निसर्ग चित्रणाचा समावेश आहे.

बहिणाबाईंची गाणी ही त्यांच्या संसाराची गाणी आहेत, ही गाणी त्यांच्या पोटातून ओठांवर आली आहेत. निसर्गातील विविधतेचे निरीक्षण व बारकाव्यांचे त्यांनी केलेले वर्णन वाखाणण्यासारखे आहे, अरे खोप्यामधी खोपा, सुगरनीचा चांगला देखा पिलासाठी तिनं, झोका झाडाले टांगला; बहिणाबाईच्या अशाच कविता मराठी मनाला स्पर्शून जातात.

महाराष्ट्रातील कवी सोपानदेव चौधरी हे बहिणाबाईंचे पुत्र बहिणाबाईच्या मृत्यूनंतर बहिणाबाईचे सुपुत्र कविवर्य सोपानदेव व त्यांचे मावसबंधू पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली बहिणाबाईची गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. आपल्या आईच्या मृत्यूनंतर तिच्या चीजवस्तू पाहताना हे हस्तलिखित सोपानदेवांच्या हाती लागले. ह्या कविता सोपानदेवांनी आचार्य अत्रे ह्यांना दाखविल्या, अत्रे उद्‌गारले, अहो हे तर बावनकशी सोनं आहे. हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणं हा गुन्हा आहे, आणि अत्रे यांनी त्या कविता प्रकाशित करण्यात पुढाकार घेतला. अत्रे ह्यांच्या विस्तृत प्रस्तावनेसह बहिणाबाईची गाणी १९५२ मध्ये (दुसरी आवृत्ती १९६९) प्रकाशित झाली आणि 'धरत्रीच्या आरशामधी सरग' (स्वर्ग) पाहणाऱ्या ह्या कवयित्रीचा महाराष्ट्रास परिचय झाला. ह्या काव्यसंग्रहात बहिणाबाईच्या फक्त ३५ कविता आहेत; परंतु कवित्वाची कोणतीच जाणीव मनात न ठेवता, केवळ सहज म्हणून रचलेल्या त्यांच्या बऱ्याच कविता वेळीच लेखननिविष्ट न झाल्याने त्यांच्याबरोबरच त्यांच्यासोबत गेलेल्या आहेत. बहिणाबाई यांच्या काव्यरचनांवर आधारित खानदेशचा मळा आणि मराठवाड्याचा गळासांस्कृतिक कार्यक्रम बहिणाबाईंच्या काव्यरचनांवर आधारित खानदेशचा मळा आणि मराठवाड्याचा गळा हा सांस्कृतिक कार्यक्रम मराठवाड्यातील गायकांच्या आवाजात सादर केला जातो. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे निर्माते, संगीत दिग्दर्शक, गायक प्रा. डॉ. अशोक जोंधळे आणि अशाताई जोंधळे आहेत.

– राहुल शोभाबाई लक्ष्मणराव भालेराव
जिल्हा माहिती अधिकारी, पालघर

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अत्यावश्यक

कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शेतकऱ्यांना जलदगतीने सेवा देण्यासाठी युनिक आयडीचा उपयोग होणार आहे. यात शेतकऱ्यांच्या नावावर शेतजमीन असेल तर त्यांना फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषीविषयक सेवा, सुविधा तसेच शासकीय योजनांचे लाभ पारदर्शकपणे मिळू शकतील. यासाठी ' ग्री स्टॅक' नावाने डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. याची नोंदणी प्रत्येक महा-ई-सेवा केंद्रावर सुरू असून सर्व शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार होण्यासाठी हा उपक्रम प्रशासनाकडून प्राधान्याने हाती घेण्यात आला. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे, असे आवाहन तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. ग्रिस्टॅकमुळे पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करून घेण्यात सुलभता राहील. आता फार्मर आयडी असेल तर शासनाच्या सर्व योजनेचे लाभ घेता येणार आहे. अन्यथा लाभ मिळणार नाही. त्यामुळे नजीकच्या महा-ई-सेवा केंद्रावर जाऊन आपल्या सातबारा आधार लिंक करून फार्मर आयडी तयार करून घेण्याचे आवाहन कृषी अधिकारी मुंढे, कृषि सहाय्यक अनिल इंचुरे यांनी केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

॥ जय माता जी ॥

॥ माता वारोंडाढेवी प्रसन्न ॥

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ७ मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ ते रविवार दि. २ मार्च २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

प्रेयसीने ब्लॅकमेल करून पैसे लाटले चिडलेल्या प्रियकराने मुंडकेच छाटले

राहुरी/क्राईम रिपोर्टर

पैसा आणि शरीर सुखाला चटावलेल्या काही महिला एकाच वेळी दोन-दोन पुरुषांशी संबंध ठेवतात, तर काही विवाहित महिला पतीला सोडून प्रियकरासोबत जावून रहातात आणि त्याच्याशी बिनसले कि पुन्हा पतीकडे येतात. पुन्हा पतीशी बिनसले कि प्रियकराला संपर्क साधतात. या दरम्यान त्यांच्या या दुहेरी चारित्र्याची पती आणि प्रियकर दोघांनाही माहिती मिळते. त्यामुळे दोघेही अशा महिलेपासून दूर ...पान ४ वर

नको ते नजरेस पडताच संतापाने पेटला आईच्या प्रियकराचा मुलाने जीव घेतला

सांगली/क्राईम रिपोर्टर

मुले वयात आली कि त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत यासाठी आई-वडिलांनी आपले वर्तन सुधारायचे असते. आपल्या वागण्याचा मुलांवर वाईट परिणाम होणार नाही याची काळजी घ्यायची असते. पण दुर्दैवाने काही लोकांना हेच कळत नाही. अल्पवयीन मुलांच्या समोर जर आई किंवा वडील जर नको त्या गोष्टी करू लागले तर त्याचा मुलांवर परिणाम होतो आणि आई वडिलांच्या विषयी मुलांमध्ये तिरस्काराची भावना निर्माण होते. आजकाल समाज खूप पुढारलेला आहे. सोशल मिडीयाच्या माध्यामतून लहान वयातच मुलांना बऱ्या वाईट गोष्टी समजायला लागल्या आहेत. त्यातच मित्रमंडळींच्या सहवासात राहून लहान वयातच मुलांना लैंगिक संबंधाविषयी बरीच माहिती मिळालेली असते. परिणामी त्या विषयाबाबत त्यांचे आकर्षण सुद्धा वाढलेले असते. अशावेळी कुटुंबातील स्त्री पुरुषांच्या संबंधाविषयी जर काही चुकीच्या गोष्टी त्यांच्या निदर्शनास आल्या तर त्याचा मुलांच्या मनावर परिणाम होतो आणि मुले बिघडतात. सांगलीवाडी येथे राहणाऱ्या एका महिलेचे दत्ता सुतार नावाच्या इसमाशी अनैतिक संबंध होते. विशेष म्हणजे पतीपासून विभक्त राहणाऱ्या या महिलेला १५ वर्षाचा मुलगा होता. वास्तविक वयात आलेला मुलगा असताना आईने आपल्या भावनांना आवर घालायला हवा होता. मुलासमोर परपुरुषाशी संबंध ठेवणे चुकीचे होते. पण दत्ता सुतारच्या प्रियसिला नेमके तेच कळत नव्हते, ती बेधडक मुलगा घरात असताना आपल्या प्रियकराशी शृंगारिक चाळे करायची. मुलासामोरच त्याच्या सोबत झोपत असे. या गोष्टीचा मुलाला प्रचंड राग होता. पण दत्ता सुतार घर चालवत असल्याने तो त्याला काही बोलत नसे. तर दुसरीकडे दत्ता सुतार त्याच्या आईला पत्नीसारखी वागवत असे. कधी कधी तिला मारहाणही करीत असे. अशावेळी जर त्या मुलाने विरोध केला तर दत्ता त्यालाही मारहाण करीत असे. त्या मुलाने एक घोड्याचे पिल्लू आणले होते, आजकाल त्याचाही खर्च दत्ताला करावा लागत असे त्यामुळे तो आणखी चिडला होता. त्या मुलाला त्याने पैसे देणेही बंद केले होते, याचा राग त्या मुलाला होता आणि याच रागातून एके दिवशी त्याने मित्राच्या मदतीने दत्ताला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी त्या मुलासह त्याच्या अन्य २ अल्पवयीन साथीदारांना अटक केली आहे.

सांगलीवाडी येथील इंदिरानगर येथे दत्ता शरणाप्पा सुतार हा राहयला आहे. दत्ता सुतार याच्या लग्नाला पाच सहा वर्ष झाली होती. त्याला दोन मुले ही आहेत. तो सेंट्रींगचे काम करीत असतानात त्याला दारू पिण्याची सवय लागली. तो रोज कामावरून घरी येताना दारू पिऊनच येऊ लागला. त्यातच त्याचे एका महिलेशी विवाहबाहय संबंध जुळले. तो आपल्या मोलमजुरीचे पैसे तिच्यावर खर्च करू लागला.आधीच त्याला दारू पिण्याचे व्यसन त्यात त्याने ठेवलेल्या बाईवर पैसे खर्च करू लागल्यावर त्याची आणि त्याच्या बायकोची या कारणातून रोज भांडणे होऊ लागली. तो तिला मारहाण करीत शिवीगाळ करू लागला होता. त्यामुळे त्याची बायको त्याचेवर चिडून होती.भांडणात ती ...पान ४ वर

प्रेमसंबंधातून मुलगी गर्भवती झाली जन्मदात्या आईने तिची हत्या केली

नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

आजकाल मुला-मुलींमधील प्रेमसंबंध हे शारीरिक आकर्षणातून निर्माण झालेले असतात. त्यामुळे प्रेम संबंध जुळले कि दोघांनाही खास करून प्रियकराला शरीरसुखाची घाई झालेली असते. अशा संबंधातून जेंव्हा एखादी मुलगी गर्भवती राहते, तेंव्हा तिच्या कुटुंबियांना समाजात तोंड दाखवायला जागा रहात नाही. समाजात बदनामी होते आणि बदनामीच्या भीतीतून मग ते टोकाचा निर्णय घेतात. नालासोपारा येथे अशीच एक घटना घडली आहे. प्रेमसंबंधातून अविवाहित मुलगी गर्भवती राहिल्याने मुलीच्या आईनेच आपल्या दुसऱ्या मुलीच्या मदतीने गर्भवती मुलीची हत्या केली आणि या हत्येला आत्महत्येचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी तिचा हा बनाव हाणून पडला आणि आणि आरोपी मायलेकींना अटक केली.

मुलगी गर्भवती राहिल्याने संतप्त झालेल्या महिलेने मुलीची गळा दाबून हत्या केली आहे. शवविच्छेदन अहवालातून हा प्रकार उघडकीस आला. हत्या करण्यासाठी तिच्या अल्पवयीन बहिणीने देखील मदत केली. शनिवारी पोलिसांनी आरोपी महिला ममता दुबे हिला अटक केली आहे. महाविद्यालयात शिकणारी अस्मिता दुबे (२०) ही तरुणी नालासोपारा पश्चिमेच्या यशवंत गौरव येथील फेज मधली जय विजय नगरी या इमारतीत आई वडिल तसेच लहान बहिणीसह रहात होती. गुरूवारी दुपारी तिच्या पोटात दुखत लागले आणि त्यामुळे ती अचानक मरण पावल्याची फिर्याद तिची आई ममता दुबे (४६) हीने नालासोपारा पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलिसांनी अकस्मात मृत्यूचा गुन्हा दाखल केला होता. मात्र तिचा चेहरा सुजलेला होता तसेच दोन्ही हातावर चावा घेतल्याने निशाण होते. त्यामुळे पोलिसांना संशय आला आणि त्यांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईच्या जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आला. शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर अस्मितची मृत्यू ही आत्महत्या नसून गळा आवळून केल्याचे निष्पन्न झाले. याबाबत माहिती देताना नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस ...पान ४ वर

कंटाळली होती रोजच्या छळा पत्नीने आवळला पतीचा गळा

बेळगावी/क्राईम रिपोर्टर

स्त्री असो कि पुरुष माणसाच्या सहनशीलतेला मर्यादा असतात. एकदा का माणसाच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि माणसाच्या संतापाचा कडेलोट झाला कि मग तो कोणाचीही परवा करीत नाही. बेळगावात रहाणाऱ्या आशा रायबागच्या बाबतीत असेच झाले होते. पतीमुळे तिचे जगणे मुश्कील झाले होते. तो तिला जगायलाही देत नव्हता आणि मरायलाही देत नव्हता. त्यामुळे आशाची सहनशीलता संपली होती. तिचा पती दारू पिऊन तिच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. तिला मारहाण करायचा, अखेर एके रात्री दोघांमध्ये कडाक्याचे भांडण होताच चिडलेल्या आशाने दारूच्या नशेत असलेल्या पतीचा ओढणीने गळा दाबून जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आशाला अटक केली आहे.

अमित रायबाग हा टीव्ही दुरूस्तीचे काम करीत असल्याने त्याला तसे काम कमीच होते. त्यामुळे मुलांचे शिक्षण आणि घर खर्च यामुळे तो बेजार झालेला होता.पत्नी आशाबरोबर त्याची रोज भांडणे होत होती. ते चिक्कोडी तालुक्यातील कब्बुर हून कामाच्या शोधात बेळगावी येथे आले होते. रामतीर्थनगर येथे ते भाडयाने ...पान ४ वर

उसन्या पैशावरून दोघांमध्ये वाद झाला चिडलेल्या मित्रानेच मित्राचा खून केला

लातूर/प्रशांत मसके

मैत्रीमध्ये सहसा आर्थिक व्यवहार करू नयेत आणि केले तरी ते वेळेवर मिटवावेत. कारण पैशावरून मैत्रीत दुरावा येतो आणि मैत्रीचे रुपांतर दुष्मनीत होते. पुढे त्यातून जुने मित्र एकमेकांच्या जीवावर उठतात आणि त्यातुन एखाद्याचा जीवही जातो. लातूरमध्ये असेच घडले. नजीर पाशा सय्यद आणि सतीश वाघमारे मित्र होते. नजीरने सतीशकडून उसने पैसे घेतले होते, पण ते परत करण्यास टाळाटाळ करीत होता. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला आणि याच वादातून सतीशने नजीरची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

लातूर शहरातील विवेकानंद चौक पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या बाभळगाव नाका ते बसवेश्वर चौक रिंग रोडच्या सर्विस रोड लगत असलेल्या उस्ताद ताहीर बिर्याणी हॉटेलच्या सेटर जवळ एक ४० वर्षीय तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची ...पान ४ वर

संशयामुळे संसाराची वाताहात झाली पत्नीचा खून करुन आत्महत्या केली

धुळे/क्राईम रिपोर्टर

आजकाल मुलगा आणि मुलगी असा कुणी भेदभाव करीत नाही. कारण मुले मोठी झाल्यावर आई-वडिलांसाठी जितका मुलगा करू शकतो, तेवढे मुलगीही करते. मात्र तरीही काही लोकांना मुलगाच हवा असतो. धुळे जिल्ह्याच्या देवगावमध्ये रहाणाऱ्या हिरा बैसाणेच्या बाबतीत असेच झाले. दोन्ही मुळीच झाल्याने तो बायकोचा छळ करू लागला. तिच्यावर संशय घेऊ लागला आणि एके दिवशी पत्नीच हत्या करून त्यानेही आपले जीवन संपवले.

आपल्या भावी सुख संसाराचं स्वप्न पहाणाऱ्या अनिताचं लग्न झालं खरं, पण तब्बल १०-१२ वर्षातच तिच्या संसाराचं मातेरं झालं. तिच्या नवऱ्याचं नाव हिरा, पण तो फक्त नावालाच हिरा होता, पण प्रत्यक्ष त्याचं वागणं हिऱ्यासारखं नव्हतचं मुळी. हा हिरा पुढे काच निघेल असे अनिताला वाटल नव्हतं, कारण तो भविष्यात निकम्मा निघाला. अनिताच्या माहेरची आर्थिक स्थिती जेमतेमच होती, पण शोधाशोध करून अनिताच्या आई-वडीलांनी परिचित वाल्मिक वैसाणे याच्या हिरा नावाच्या मुलाबरोबर अनिताचं लग्न ...पान ६ वर

शेतामधील अँगल भलत्यानेच काडून नेले चोरीच्या संशयावरून दारुड्याला ठार केले

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

कोणताही गुन्हा घडला कि त्याची माहिती पोलिसांना द्यायची असते. कारण गुन्हेगारांना पकडण्याचे काम पोलिसांचे असते तर त्यांना शासन करण्याचे काम न्यायपालिकेचे असते. पण काही लोक स्वतःच कायदा हातात घेवून एखाद्या आरोपीला शासन करण्याचा प्रयत्न करतात अशा प्रयत्नात एखाद्या निरपराध माणसाचा जीव जाऊ शकतो. बुलढाणा जिल्ह्यातील विष्वी गावात अशाच एका घटनेत चोरीच्या संशयावरून एकाची हत्या करणात आली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली आहे.

विजय खंडारे हा युवक कुठेही काम नसल्याने घरीच होता. त्याच्या घरासमोर गावातील नितेश खंडारे याची दुचाकी येऊन थांबली, दुचाकीवरून उतरून विजयचा भाऊ संतोष खंडारे घराच्या अंगणात आला. निलेश दुचाकी घेऊन निघून गेला, संतोष थोडासा झुकत चालत होता. नेहमीच दारूच्या नशेत असणाऱ्या संतोषला जास्तच झाली असावी असे विजयला वाटले, मात्र संतोष जवळ येताच खूप भेदरलेला वाटत होता. विजयने काळजीनेच भाऊ संतोषकडे 'काय झाले?' अशी विचारणा केली, तेंव्हा संतोषने सांगितले की, मला नितेश खंडारे, सतिश त्रिकाळ, पवन वाघमारे, पवन राठोड यांनी चोरीच्या संशयावरून बेदम मारहाण केली असे जीव ओतून खोल आवाजात सांगत होता, त्यामुळे दवाखान्यात चल अशी त्याला विजयने विनंती केली, मात्र मला एक ग्लास पाणी दे, खूप त्रास होत आहे असे म्हणून पाण्याचा एक ग्लास अधाशाप्रमाणे ...पान ६ वर

दारुच्या नशेत भलतेच बोलून फसला मित्राच्याच हातून जीव गमावून बसला

वाई/क्राईम रिपोर्टर

दारूच्या पार्टीत नाश झाली कि पिणाऱ्याचा तोल जातो. अशावेळी त्यांना भान राहत नाही. दारूच्या नशेत काहीही बोलून जातात. राज अरुणकुमार सिंग आणि त्याच्या मित्रांच्या दारूच्या पार्टीत असेच झाले. राजने दारूच्या नशेत प्रणीत गायकवाड याच्या घरातील महिलांवर अश्लील टिप्पणी केली. कुठलाही माणूस किती जरी दारुडा असला तरी आपल्या घरातील महिलांच्या विषयी कुणी काही बोलले तर ते त्याला राग येतो. त्यामुळे प्रणीत चिडला आणि त्याने रिकाम्या बियरच्या बाटलीने राजचे डोके फोडून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

बिहार राज्यातील राज अरूणमुमार सिंग हा २६ वर्षीय तरूण महाराष्ट्रा तील वाई येथे गेल्या तीन वर्षापूर्वी कामाला आला. तो मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करू ...पान ६ वर

अनैतिक संबंधात जेंव्हा अडथला आला प्रियकराच्या मदतीने पतीचाच गेम केला

चिक्कोडी (रायबाग)/क्राईम रिपोर्टर

एखाद्या बाईला संसारात पतीकडून मनासारखे सुख मिळाले नाही कि मग त्या सुखासाठी ती सावज हेरु लागते आणि एकदाका मनासारखे सावज मिळाले कि मग ती त्याच्या आहारी जाते. अशावेळी तिच्या मार्गात कुणी आला कि त्याचा अडसर दूर करण्यासाठी ती कोणत्याही थराला जाते. चिक्कोडी जवळच्या बस्तवाड मधील सिध्दव्वाच्या बाबतीतही असेच झाले. दोन मुलांची आई असलेल्या सिध्दव्वा हिला पती तुकारानकडून मनासारखे सुख मिळत नव्हते म्हणून तिने गणपती कांबळे नावाच्या तरुणाला जवळ केले. मात्र तिचे अनैतिक संबंध पतीला समजताच तो तिला मारहाण करू लागला. त्यमुळे चिडलेल्या सिध्दव्वाने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली. या प्रकरणी तिला तिच्या प्रियकरासह पोलिसांनी अटक केली आहे.

रायबाग जवळील बस्तवाड येथील आण्णासाहेब उर्फ तुकाराम ओलेकर याचा विवाह गेल्या १६ वर्षापूर्वी सिध्दव्वा हिच्यासोबत झाला. तुकाराम याची गावात थोडी फार शेत जमीन असल्याने घरची परिस्थीती ही बऱ्यापैकी होती. घरच्या शेतीवरच त्याच्या घराचा रहाटगाडा चालत होता. सिध्दव्वा ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने तिची भरगच्च जवानी ही चार चौघात उठून दिसत होती. या दाम्पत्यांला दोन मुले ही झाली. संसाराचा गाडा सुरूळीत सुरू असताना सिध्दव्वा हिचे संसारात लक्ष लागेना. तिची जवानीची भूक ही नवरा ...पान ६ वर

24 FEBRUARY TO 02 MARCH 2025 - Page 4 (CRIME SANDHYA)_Layout 1 24-02-2025 16:31 Page 1

पान ३ वरून...

प्रेयसीने ब्लॅकमेल करून पैसे ...

राहण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे चिडलेली ती महिला दोघांनाही ब्लॅकमेल करून पैसे उकळण्याचा प्रयत्न करते. राहुरीत प्रियकर आणि पतीला त्रास देणाऱ्या अशाच एका महिलेला प्रियकराने ठार मारले. कोयत्याने तिचे शीर धडावेगळे केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली आहे. प्रियकराने प्रेयसीचा निघृण खून केल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांबोरी शिवारात बुधवारी रात्री उशिरा घडली. घटनेनंतर आरोपी प्रियकर स्वतः वांबोरी येथील पोलिस चौकीत हजर झाला. मयत आणि आरोपी दोघे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील आहेत. सोनाली राजू जाधव असं खून झालेल्या २८ वर्षीय तरुणीचं नाव आहे. मयत सोनाली राजू जाधव व ५३ वर्षीय सखाराम धोंडिबा वालकोळी यांच्यात अनैतिक संबंध होते. दोघे जण काही काळ पती-पत्नी सारखे राहत होते. काही दिवसांपूर्वी मयत सोनाली ही प्रियकर सखाराम याला सोडून तिच्या पतीकडे गेली होती. त्यानंतर तिने पुन्हा सखाराम याला फोन करून मला तुझ्याकडे यायचे आहे, मला पैसे दे, मी पती सोबत गेले होते. त्याच्यावर गुन्हा दाखल करणार आहे. तसेच तू मला नाही सांभाळले तर मी तुला सोडणार नाही. तुझ्याविरुद्ध गुन्हा दाखल करीन, अशी धमकी दिली. त्यामुळे सखाराम तिच्या धमकीला वैतागला होता. त्यातून त्याने हे कृत्य केले. घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उप विभागीय पोलिस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे, पोलिस निरीक्षक संजय ठेंगे आदींसह पोलिस पथक घटनास्थळी गेले. मयत सोनाली हिचे धड व धडापासून वेगळे झालेले शिर ताब्यात घेतले. त्यानंतर मृतदेह जिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविला. राहुरी पोलिसांनी आरोपी सखाराम वालकोळी याला अटक केली. पोलिस नाईक सुनील निकम यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. कोयत्याने शीर धडावेगळेबुधवारी सायंकाळी सोनाली पुणे येथून अहिल्यानगर येथे आली. बसस्थानकावर दोघांची भेट झाली. त्यानंतर सखाराम हा सोनाली हिला घेऊन वांबोरी परिसरात असलेल्या पंचमुखी महादेव मंदीरा शेजारच्या डोंगराजवळ आला. रात्री त्या दोघांमध्ये वाद झाला आणि सखाराम याने सोनाली हिला लाकडी दांडा व दगडाने मारहाण केली. त्यानंतर त्याने कोयत्याने सोनालीवर वार करून तिचे शीर धडापासून वेगळे केले. त्यानंतर आरोपी सखाराम स्वतः वांबोरी पोलिस चौकीत हजर झाला आणि गुन्हा केल्याची कबुली दिली.

नको ते नजरेस पडताच संतापाने...

ही त्याला उलट बोलून शिव्या शाप देवू लागली होती.त्यामुळे दत्ता ही वैतागलेला होता. त्यातच तो गेल्या दोन तीन वर्षापासून ठेवलेल्या बाईच्या घरीच राहू लागला. त्याची बायको आणि मुले सांगलीतील शिवशंभो चौकात राहत होते. तर दत्ता हा ठेवलेल्या बाई सोबत सांगलीवाडी येथील इंदिरानगर येथे राहू लागला. त्याने ठेवलेल्या बाईला एक १५ वर्षाचा मुलगा होता. त्या अल्पवयीन मुलाला सगळे समजत होते. तो आपला खरा बाप नाही हे ही त्याला माहित होते. परंतु त्याच्या आईचे त्याच्याबरोबर प्रेमसंबंध असल्याने तो काही करू शकत नव्हता. उघडया डोळ्यानी तो अल्पवयीन मुलगा आपल्या आईचा आणि दत्ता सुतारचा खेळ बघत होता. खरे तर त्याचे समवयस्क मित्र त्याला या कारणातून चिडवत होते. तुझी आईने दुसऱ्याला ठेवून घेतलेले आहे.तु खऱ्या बापाचा नाहीस असे ते त्याला म्हणत होते. तो लहान होता त्यावेळी सगळे काही ठिक होते परंतु तो मुलगा आता १५ वर्षाचा झालेला होता. त्याच्या समोरचा दत्ता हा त्याच्या आईबरोबर झोपत होता. तिच्याबरोबर मज्जा मारीत होता. त्यामुळे तो मुलगा दत्तावर वाकडया नजरेने बघत होता. हा आपला बाप नाही, तो आपल्या आईचा यजमान आहे त्याच्यामुळे आपण राहत असलेल्या ठिकाणी आपली बदनामी होत आहे हे तो ओळखून होता. परंतु त्याचे ही त्याच्या आईसमोर काही चालत नव्हते. दत्ता त्याच्याच घरी राहत असल्याने तो ठेवलेल्या बाईला आणि तिच्या मुलाला खर्चाला पैसे देत होता. एकप्रकारे तो त्याचे घरच चालवित होता. त्या बाईने ही नवऱ्याला सोडले असल्याने ऐन जवानीत तिने दत्ताचा हात धरला होता. तो तिचे घर चालवित असल्याने तो तिच्याबरोबर मज्जा ही मारत होता. त्यातच त्या अल्पवयीन मुलाने घोडयाचे एक पिल्लु सांभाळले होते. ते पिल्लु आता थोडे मोठे झालेले असल्याने त्याच्या ही वैरणीची खर्च वाढलेला होता. त्या खेचरला तो अल्पवयीन मुलगा रोज बाहेर हिडवून फिरवून आणीत होता. खेचर मोठे झाल्यावर त्याला शर्यतीला जुपायचे असे त्या अल्पवयीन मुलाच्या मनात होते. म्हणून तो त्याचेवर जास्तच खर्च करीत होता. त्यामुळे दत्ताच्यात आणि त्या मुलाच्यात नेहमी या कारणातून वाद होत होता. त्याने उगीचच खेचर पाळले आहे असे दत्ताला वाटत होते. त्याचा ही खर्च दत्ताला करावा लागत असल्याने दत्ताची चिडचिड होत होती. या वादात तो कधी कधी अल्पवयीन मुलास मारहाण ही करीत होता. याचा राग त्या अल्पवयीन मुलाला ही येत होता. त्या मुलास दत्ता मारहाण करू लागला की, त्याची आई मध्ये पडून त्याला सोडवून घेत होती त्यामुळे दारूच्या नशेत असणारा दत्ता हा तिला ही मारहाण करीत शिव्या देत होता. त्यामुळे त्या बाईने ही त्याला आपले घर सोडून जाण्यास सांगितले होते. परंतु दत्ता हा तिच्या जवानीत इतका अडकला होता की, त्याला तेथून बाहेर पडावेसे वाटत नव्हते. त्यामुळे तो ही गप्प राहत होता. एक तर त्याला त्याच्या बायकोने ही घराबाहेर काढले होते तर दुसऱ्या बाईने ही त्याला बाहेरचा रस्ता दाखविला असल्याने त्याला इकडे आड तिकडे विहिर अशी त्याची स्थिीती झालेली होती. त्या बाईवर तिच्या मुलावर आणि खेचरावर होणारा खर्च बघून दत्ताचे डोके फिरले होते. त्याला आता बाई का ठेवली याचा पश्यातापा होत होता.सकाळी कामावर गेला की तो रात्री दारू पिऊनच घरी येत होता. घरी आला की परत त्याचे त्या बाईबरोबर त्या अल्पवयीन मुलाबरोबर राडा होत होता.दत्ताचा मित्र अतुल ठोंबरे हा ही सेंट्रिंगचे काम करीत होता. त्याला दत्ताची सगळी कहाणी माहिती होती.तो ही त्याच्या घरी कधी कधी येत होता. ते दोघे मिळूनच दत्ताच्या दुचाकी गाडीवरून कामावर जात होते. रात्री दोघे मिळूनच दारू पिऊन कामावरून येत होते. त्यामुळे दत्ता सगळी कहाणी त्याला सांगत होता. हल्ली दत्ता हा त्या अल्पवयीन मुलाच्या समोरच त्याच्या आईबरोबर झोपत असल्याने त्या मुलाची ही चिडचीड होत होती. त्याला ते खपत नव्हते. त्यामुळे तो मुलगा ही त्याच्याबरोबर भांडण काढीत होता. खरे तर त्या मुलग्याला दत्ता आपला मुलगाच मानत होता. परंतु तो मुलगा त्याला आपला बाप मानायला तयार नव्हता. त्यामुळे रोजची भांडणे वाढीस लागलेली होती. या भांडणात दत्ता हा त्या मुलग्याला आणि त्याच्या आईला ही मारहाण करीत शिवी गाळ करीत होता. त्यामुळे अल्पवयीन मुलाच्या डोक्यात एक वेगळाच विचार येत होता. त्याने आता दत्ताची गेम करण्याचा विचार केला होता. तसे त्याने आपल्या समवयस्क मित्रांना बोलून ही दाखविले होते.ते मित्र ही त्याचे जिवलग असल्याने त्यांनी ही याकामी त्याला मदत करण्यास तयार आहे असे सांगितले. त्याचे ते मित्र ही खेचराबरोबर येत होते. त्या खेचरला पळविणे, त्याला शर्यतीसाठी तयार करणे त्यासाठी ते त्याला मदत करीत असल्याने या कामी ही त्यांनी त्याला मदत करण्यास तयार आहे असे सांगितले. नेहमीप्रमाणे गुरूवार दि.२० फेब्रुवारी रोजी अतुल ठोंबरे हा कामावर जाण्यासाठी दत्ताच्या घरी सकाळी आला. त्यावेळी घरात दत्ताची आणि त्या अल्पवयीन मुलाचा वाद सुरू होता. हा वाद ज्यावेळी सोडवायला दत्ताची प्रियेसीमध्ये पडली त्यावेळी दत्ताने रागाच्या भरात तिला व मुलास मारहाण करीत शिवीगाळ केली. तो अल्पवयीन मुलगा दत्ताकडे पैशाची मागणी करीत होता दत्ता त्याला पैसे देण्यास तयार नव्हता. या कारणातून त्याची भांडणे जोरात झाली. रागारागाने दत्ता हा आपल्या दुचाकी गाडीवरून अतुल यास घेऊन कामावर गेला. दुपारी १२च्या दरम्यान परत ठेवलेल्या बाईच्या मुलाचा त्याला फोन आला. त्याने परत त्याच्याकडे पैशाची मागणी केलेली होती. त्या मुलाने दत्ताला पैसे घेऊन सांगलीवाडी ते कदमवाडी रस्त्यावर पैसे घेऊन येण्यास सांगितले. त्यामुळे रागात का होईना चिडून दत्ता आणि त्याचा मित्र अतुल हे दोघे पैसे घेऊन दुचाकी क्र.एम एच ०९बी क्यु ४९८५ वरून कदमवाडी रस्त्यावर आले. कदमवाडी रस्ता तसा दिवसा ही निर्मनुष्य असाच असल्याने त्या रस्त्यावर त्यावेळी कुणीच नव्हते. दुर शेतात कुठे तरी शेतकरी शेतात काम करताना दिसत होते. आधीच कदमवाडी रस्त्यावर तो अल्पवयीन मुलगा आणि त्याचे दोन साथीदार हे होते. दत्ता गाडीवरून खाली उतरत असतानाच त्या अल्पवयीन मुलाने त्याची गाडी पाडली. त्यामुळे दत्ता आणि त्याचा मित्र अतुल ठोंबरे हे खाली पडले. त्याचेवेळी त्या मुलाने दत्ताच्या छातीत मोठा दगड उचलून घातला. त्यासरशी दत्ता बोबंलत ओरडला मी मेलो, मी मेलो तो ओरडत असतानाच त्या अल्पवयीन मुलाने परत दत्ताच्या चेहऱ्यावर आपल्याकडील चाकूने सपा सपा वार केले. त्यामुळे दत्ताच्या चेहऱ्यावर जखमा झाल्या. त्याच्या चेहऱ्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला. तो मुलगा आणि त्याचे दोन मित्र एवढयावरच थांबले नाहीत त्या मुलाने परत दत्ताच्या अंगावर, हातावर मानेवर चाकूने वार करीत रांडेच्या माझ्या आईबरोबर झोपतोस आणि खर्चाला पैसे देत नाहीस म्हणत वार केले. त्यासरशी दत्ताचा जागीच मृत्यू झाला. दत्ता सुतारला तीन अल्पवयीन मुले मारहाण करीत असताना त्याचा मित्र अतुल ठोंबरे हा घाबरून गेला. त्याच्या तोंडून शब्दच बाहेर पडेनात. दत्ताचा जागीच मृत्यु झाल्याचे बघून अतुल याने घटनास्थळावरून पळ काढला.दत्ताला मारहाण करून ते तिघे ही अल्पवयीन मुले तेथून पळुन गेले. कदमवाडीतील कच्चा रस्त्यावर चाललेला आरडा ओरडा बघून शेतात काम करीत असलेले दोन तीन शेतकरी रस्त्यावर धावत पळत आले. रस्त्याकडेला दुचाकी पडलेली होती तर बाजुलाच रक्ताच्या थारोळ्यात तरूण पडलेला होता. बाजुला गवतात कोयता ही पडला होता. हे बघून कुणी तरी या घटनेची माहिती सांगली शहर पोलीसांना दिली. यावेळी कोल्हापूरचे विशेष पोलीस महानिरीक्षक सनिल फुलारी हे सांगली दौऱ्यावर होते. सकाळी स्टेशन चौकातील पोलीस उपअधिक्षक कार्यालयात तपासणी सुरू असताना ही खूनाची माहिती समजली.त्यामुळे पोलीस महानिरीक्षकांनी बैठक सोडून सांगलीवाडीतील कदमवाडी येथील घटनास्थळी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना देवून संशयीतांचा शोध घेण्यास सांगितले. सांगली शहर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सांगली येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पडलेला मृतदेह हा अनोळखी होता. मयत तरूण हा सांगलीवाडी किंवा कदमवाडी परिसरातील नसल्याने कुणी त्याला ओळखत नव्हते. मात्र पोलिसांनी घटनास्थळी पडलेल्या मोटार सायकलीच्या नंबरवरून मृतदेहाची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. त्यातच घटनास्थळावरून पळून जाताना मयत तरूणाची ओळख ही गावातील लोकांना होती. त्यांनी त्याचे नाव पोलीसांना सांगितले. त्यानुसार पोलीसांनी मयत तरुण दत्ता सुतार हा असल्याचे अतुल ठोंबरे याने पोलीसांना सांगून या घटनेची संपुर्ण माहिती पोलीसांना सांगितली. या घटनेचा तपास सांगली शहर पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करत होते. या पथकाला या घटनेतील संशयीत आरोपी हे लक्ष्मी फाटा येथील कचरा डेपोजवळ लपून बसल्याची माहिती मिळाली. या ठिकाणी पोलीसांना बघून ते तिघे ही अल्पवयीन मुले तेथून पळून जात होते. त्याचा पाठलाग करून या घटनेतील तिघा अल्पवयीन मुलांना पोलीसांनी ताब्यात घेऊन सांगली शहर पोलीसाच्याकडे सोपविले. सांगली शहर पोलीस या घटनेची त्याच्याकडे चौकशी करीत असताना ते तिघे ही पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होते. पोलीसांनी त्यांना पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपले तोंड उघडले आणि आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना देऊन या गुन्हयात वापरलेला चाकू ही पोलिसांना दिला. या घटनेची फिर्याद मयत दत्ता सुतार याचा मित्र अतुल ठोंबरे याच्याकडून पोलीसांनी घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी दत्ता शरणाप्पा सुतार (वय ३२) याच्या खून प्रकरणी तीन अल्पवयीन मुलाच्यावर भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्यांना सांगली येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने या तिघा अल्पवयीन तरूणांची रवानगी बाल सुधारगृहात केली. या घटनेचा तपास सांगली शहर पोलीसा बरोबरच स्थानिक गुन्हे शाखेचे पो.उप. निरी.महादेव पोवार, संदीप पाटील, गौतम कांबळे, संतोष गळवे यांनी केला.

प्रेमसंबंधातून मुलगी गर्भवती ...

निरीक्षक विशाल वळवी यांनी सांगितले की, मयत अस्मिता ही ३ महिन्यांची गर्भवती राहिल्याचे तिच्या आईला समजल्याने ती प्रचंड संतापली होती. तिने मुलीला गर्भपात करण्यास सांगितले होते. मात्र तिने नाकर दिला. त्यानंतर तिने मुलीला बेदम मारहाण केली. तिची १७ वर्षीय लहान बहिणीने तिचे पाय धरले तर आई अस्मिताने दोन्ही हातावर चावा घेतला तसेच दोरीने गळा आवळून तिची हत्या केली. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी ममता दुबे हिच्यावर शनिवारी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३, ११५ (२) ३५१ (२) ३(५) अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. तिची बहिण अल्पवयीन असून १२ ची परिक्षा सुरू आहे. आई ममता दुबे हिला न्यायालयात हजर केले असता २५ फेब्रुवारी पर्यत पोलीस कोठडी देण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक अमरसिंह पाटील यांनी दिली.

कंटाळली होती रोजच्या छळा...

खोली करून राहत असल्याने कदाचित त्यांना घरभाडे ही परवडत नसावे म्हणून अलिकडे आशा ही कामाच्या शोधात होती. परंतु तिला तसे काम मिळत नव्हते. अमितच्या टीव्ही दुरूस्तीच्या कामाने घर खर्च चालविणे तसे जिकरीचे होऊन बसले होते. यातूनच अमित हा रोज दारू पिऊन येवून आशाबरोबर भांडण उकरून काढत तिला मारहाण करीत असायचा. या भांडणात तो तिच्या चारित्र्यावर संशय ही घेऊ लागला असल्याने ती ही त्याचेवर चिडत होती. त्याचा मुलगा ९ वर्षाचा तर मुलगी ७ वर्षाची असल्याने त्याच्या शिक्षणाचा खर्च ही त्यांना करता येत नव्हता. एकंदर घराची घडी सगळी विस्कटलेली होती. यातूनच तो आशावर संशय घेऊन तिचा मानसिक छळ ही करू लागला होता. त्यामुळे ती ही त्याचेवर चिडत होती. दोघांची रोजची भांडणे आणि शिवीगाळ ऐकून शेजारी ही वैतागलेले होते. घर मालकाने ही त्यांना तुम्ही दुसरीकडे खोली बघा असा निर्वाणीचा इशारा दिलेला होता. तरी नवरा बायकोची रोजची भांडणे काही शांत होत नव्हती. आशा ही बऱ्याच वेळेला भांडण झाले की, मुलांना घेऊन आपल्या माहेरी हिडकल येथे जात होती. ती माहेर गेली की, आठ पंधरा दिवस परत येत नव्हती.त्यामुळे अमित हा तिच्यावर जास्तच संशय घेत असायचा. तिचे बाहेर कोणाबरोबर तरी लफडे आहे म्हणून ती सारखी माहेरी निघून जाते असे तो म्हणायचा. नवरा बायकोची भांडणे नातेवाईकांनी मिटविण्याचा प्रयत्न ही केलेला होता परंतु अमितच्या मनातून तिच्या चारित्र्याचा संशय काही केल्या कमी होत नव्हता. परिणामी तो जास्तच दारू पिऊ लागला होता. त्याचे दारूचे व्यसन सुटावे म्हणून आशाने ही बरेच प्रयत्न केलेले होते.पण त्यात तिला यश आले नाही. त्याच्या भांडणाचा तमाशा हा रोजच गल्लीत चालत असल्याने अलिकडे शेजाऱ्यांनी ही त्याच्या भांडणाकडे पुर्णता दुर्लक्ष केले होते. नवरा बायकोची भांडणे त्यात आपण तरी किती लक्ष घालायचे म्हणून ते ही गप्प राहत होते. घर मालकच कधी तर त्यांना येवून समज देवून जायचे परंतु त्यांनी नवरा बायकोला किती ही समज दिली तरी त्याच्या भांडणाचा अंत काही होत नव्हता. त्याच्या भांडणाचा परिणाम त्याच्या मुलाच्यावर ही होऊ लागला होता. तरी ही ते अमितच्या लक्षात येत नव्हते.रोज दारू पिऊन घरी यायचे आशाबरोबर कशावरून तरी भांडण उकरून काढून तिला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत मारहाण करायची हे त्याचे नित्याचे झाले होते. रोजचे मडे त्याच्यासंगे कोण रडे म्हणत आशा ही कधी कधी गप्प राहत होती. परंतु तो जास्तच तिचा मानसिक त्रास देत असला तर ती ही त्यावेळी आक्रमक होत होती. ती ही त्याच्या तोंडाला तोंड लावीत त्याला नको नको ते घालून पाडून बोलत असल्याने परिणामी भांडण वाढतच होते. तिला ही राग अनावर होत होता. तिची ही सहनशिलता संपत चालली होती. नवऱ्या विषयी तिच्या मनात प्रचंड राग होता. परंतु ती तसे दाखवून देत नव्हती. आपल्याच नशिबाला दोष देत ती गप्प राहत होती. त्यातच ती बेडवर अमित याला आपल्या अंगाला हात ही लावू देत नव्हती. त्याचा तो नेमका वेगळा अर्थ काढत होता. त्याच्या दारूच्या व्यसनाला आणि संशयी वृत्तीला ती वैतागलेली होता. कधी तर याचा सोक्ष मोक्ष लावायचा असा तिने विचार केला परंतु नेमके करायचे ते काय करायचे हे तिने ठरविलेले नव्हते. रोजची भांडणे नवऱ्याचा संशयीपणा याने ती ही बेजार झालेली होती. किती दिवस नवऱ्याचा त्रास आपण सहन करायचा असा ती विचार करीत होती.यातून काही मार्ग ही नघत नव्हता. शुक्रवार दि.७ फेब्रुवारी २०२५ रोजी अमित हा नेहमी प्रमाणे सकाळी टीव्ही दुरूस्तीच्या कामासाठी बाहेर गेला. रात्री उशिरा घरी येताना तो फुल्ल दारूच्या नशेतच घरी आला.तो घरी येण्याआधीच तिने मुलांना जेवण घालून दुसऱ्या खोलीत झोपविले होते. घरी आल्या आल्या त्याने आशाबरोबर भांडण उकरून काढून तिला शिवीगाळ करीत मारहाण करायला सुरूवात केली. तो तिला मारहाण करीत असताना ती ही गप्प राहिली नाही. उलट ती त्याच्या वर्मावर बोट ठेवीत त्याला नको नको ते बोलत होती. याचा राग अमितला आला होता.तो फुल्ल दारूच्या नशेत होता. त्याला नीट उभे ही राहता येत नव्हते. तरी ही तो बायको आशाला मारायला पुढे पुढे येत होता. तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन जा तुझ्या यजमानकडे झोप जा त्याच्या बरोबर असे तो तिला नशेत म्हणाला.याचा राग तिला आला. त्याने असे म्हणताच तिने त्याला खाली पाडले. तरी तो उठून उभे राहण्याचा प्रयत्न करीत होता. तो उभे राहत असताना बेडवर धपकन पडला. त्याचवेळी आशाने बाजुलाच पडलेली आपली ओढणी घेतली आणि रागाने अमितच्या गळ्याभोवती जोरात आवळून धरली. ती आपले दात ओठ खात त्याचा गळा आवळत होती. तर तो तिला मला सोड माझा जीव जातो असे म्हणून सांगण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु तिच्या डोक्यात त्याच्या विषयी प्रचंड राग असल्याने तिने जोरात ओढणीने गळा आवळला. त्यासरशी तो बेडवर मान खाली टाकून पडला. त्याची हालचाल मंदावली. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे तिच्या लक्षात आले. तशी ती शांत झाली. स्वयंपाक घरात जावून ती पाणी प्याली थोडा वेळ विचार करीत ती तशीच बसली. त्यानंतर तिने त्याचा मृतदेह बेडवर व्यवस्थीत सरळ झोपवला. तिला झोप काही लागत नव्हती. रात्री उशिरा तिला झोप लागली. दुसऱ्या दिवशी शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी ती सकाळी सकाळी नेहमी प्रमाणे आपल्या घराला बाहेरून कुलूप लावून मॉर्निंग वॉकल गेली. ती फिरायला गेली तरी तिच्या डोक्यात अनेक विचार घोळत होते. अशातच तिच्या मोबाईलवर तिला घर मालकाचा फोन आला. घर मालकाने तिला विचारले. तुम्ही घरात नाही. रात्री तुमच्या दोघात भांडण झाले आहे. अशी विचारणा करीत घराला कुलूप लावलेले आहे. तुम्ही कुठे आहात अशी विचारणा केली. यावर तिने घर मालकाला आपण बाहेर फिरायला आली आहे. घरी येत आहे असे सागितले. घर मालकाने फोन केल्याने ती तातडीने घराकडे आली. घराचे कुलूप काढत असताना घर मालकाने तिला तुझा नवरा कुठे आहे अशी विचारणा केली. त्यावर तिने ते घरात झोपले आहेत असे सांगत त्यांना बेडरुममध्ये नेले. त्यावेळी घर मालकाने बेडवर झोपलेल्या अमितकडे पाहिले. त्याची हालचाल काहीच होत नव्हती. त्याचा श्वासोश्वास ही चालू नव्हता. त्यांना शंका आली. त्यांनी या विषयी आशाला दाबून या विषयी विचारले असता ती घाबरत घाबरत त्यांना म्हणाली रात्री यांनी झोप येईना म्हणून झोपेच्या गोळ्या खाल्ल्या होत्या. तरी घरमालकाचा तिच्यावर विश्वास बसेना. त्यांनी या घटनेची माहिती माळ मारूती पोलीस स्टेशनला दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी आले. बेडवर पडलेल्या अमित रायबाग याचा मृतदेह त्यांनी तपासून पाहिला, त्याची कोणतीच हालचाल होत नव्हती. तर गळ्यावर गळा आवळल्याच्या खुणा दिसत होत्या. पोलीसांना अमितच्या खुनाविषयी संशय आल्याने त्यांनी त्याची पत्नी आशा हिला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावर तिने पती अमित हा दारूच्या व्यसनाच्या जास्त आहारी गेला होता. तो रोज भांडण काढून मला मानसिक त्राद देत माझ्या चारित्र्यावर शितोंडे उडवित होता. काल रात्री त्याने दारूच्या नशेत माझ्याशी भांडण काढल्यावर मी त्याचा ओढणीने गळा आवळला असे सांगून तिने आपला गुन्हा कबुल केला. पोलीसांनी या घटनेची माहिती वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांना दिली. पोलीस आयुक्त याडा मार्टिन यांनी घटनास्थळी भेट देवून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पो.निरी.जे.एम कालीमिर्ची यांनी सहकार्याना पंचनामा करण्याचे आदेश दिले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्ट मार्टम साठी बेळगावी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची फिर्याद घर मालकाने दिली. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत अमित रायबाग याच्या नातेवाईकांना देवून त्यांना बोलावून घेतले. घर मालकाने दिलेल्या फिर्यादीवरून माळ मारूती पोलीसांनी अमित निजाप्पा रायबाग (३४) याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी आशा अमित रायबाग (२९) रा.दोघे ही रामतिर्थनगर बेळगावी याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून पोलीसांनी आशा हिला बेळगावी येथील कोर्टासमोर हजर केले. मा.कोर्टाने तिची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली.या दरम्यान पोलीसांनी तिच्याकडून गुन्हयात वापरलेली ओढणी जप्त केली.या घटनेचा पुढील तपास पो.निरी.जे. एम.कालीमिर्ची याच्या मार्गदर्शना खाली माळ मारूती पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

उसन्या पैशावरून दोघांमध्ये वाद ...

माहिती विवेकानंद चौक पोलीस ठाण्याला मिळाली. मिळालेल्या माहिती आधारे सकाळी ठाणे अंमलदाराचे कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांनी घटनेची प्राथमिक माहिती घेत वरिष्ठांना खबर केली. घटनेचे गांभीर्य ओळखत विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एस.ए. पाटील यांनी तात्काळ पोलीस ठाण्यातील काही खास कर्मचारी व अधिकारी यांना सोबत घेऊन घटनास्थळाकडे धाव घेतली. बाभळगाव नाक्यापासून जवळच असलेल्या ताहीर बिर्याणी हॉटेल समोर लोकांनी एकच गर्दी केली होती. पोलिसांची गाडी पाहताच गर्दीतीन काही बघ्यांनी काढता पाय घेतला. पोलिसांनी घटनास्थळावर दाखल होत गर्दी पांगवली. बिर्याणी हॉटेलच्या सेटरजवळ ३५ ते ४० वर्षीय तरुण रक्ताच्या चारोळ्यात उताना पडला होता. त्याच्या कपाळावर व डोळ्याखाली व डोक्यावर रक्त सांधाळलेली दिसत होते. बहुतेक दगडासारख्या किंवा अन्य जाड वस्तूने त्याच्या डोळ्यावर आणि डोक्यावर मारहाण किल्याचे स्पष्ट जाणवत होते. सदरील तरुणा अपघात की घातपात झाला असल्याच्या शंका कुशंका जमलेल्या लोकांतून व्यक्त केल्या जात होत्या. बहुतेक रिंग रोड वरून चालत असताना कोणीतरी अज्ञात वाहनाने धडक दिली असावी व नंतर तो जवळच असलेल्या सेटर जवळ जावुन बसला असावा व त्यातून त्याचा रक्तस्राव होऊन मृत्यू झाला असावा असाही तर्क उपस्थित लोकांतून व्यक्त केला जात होता. मात्र पोलिस घटनास्थळाचे बारकाईन निरीक्षण करत होते. विवेकानंद चौक पोलिसांनी मयताची ओळख पटविण्यासाठी घटनास्थळावर उपस्थित असलेल्या लोकांकडे अधिक विचारपूस केली. मात्र घटनास्थळावर गर्दी केलेल्या लोकांकडून कुठलाही प्रतिसाद अथवा मयताची ओळख पटावी असा कोणताही दुजोरा पोलिसांना मिळाला नाही. त्यामुळे मयताची ओळख पटवणे हे एक पोलिसासमोर आव्हान उभे राहिले. मयताची ओळख पटवण्यासाठी विवेकानंद चौक पोलिसांनी घटनास्थळाचा ताबा घेत मयताच्या आजूबाजूच्या परीसराची झाड झडती घेतली. तसाच आजूबाजूचा परिसर पिंजून काढला. दरम्यान लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांनी घटनास्थळाला भेट दिली. त्यांनी घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पंचनामा करण्याचे आदेश दिले. विवेकानंद चौक पोलीसांनी पंचनामा करण्यास सुरुवात केली. मयताच्या अंगात निळसर रंगाची पॅन्ट व अंगावर इटकरी रंगाचे टि शर्ट होते. पायात दोन पण्याचा काळा कलरचा चप्पल होता. मयताच्या चेहऱ्यावर दाढी वाढवलेली होती. पोलिसांनी मयताच्या कपड्याची झाड झडती घेतली. मात्र मयताची ओळख पटावी असा कुठलाही पुरावा पोलिसांच्या हाती लागला नाही. मयताचा चेहरा रक्ताने माखलेला होता त्याच्या चेहऱ्यावर डोळ्याच्या खालच्या बाजूस दगडासारख्या जाड वस्तूने प्रहार केल्याचे जाणवत होते. हा अपघात नसून घातपात असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत होता. दरम्यान सदरील मयत तरूण अल्पसंख्याक समाजाचा आसल्याचा दाव पोलिसांकडून केला जात होता. विवेकानंद चौक पोलिसांनी घटनास्थळावरील आवश्यक ती माहिती घेत पंचनामा आटोपला. उत्तरणीय तपासणीसाठी मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठवण्याची तजबीज केली. मयताची ओळख पटविणे हे पोलिसांसमोर एक आव्हान होते. मयताची ओळख पटवण्यासाठी विवेकानंद चौक पोलिसांनी जिल्हा भरातील व पर जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांना मयताचे अचूक वर्णन रेखांकित करत ओळख पटविण्याचे आव्हान केले. तसेच जिल्हा भरातील पोलीस ठाण्यात अशा वर्णनाचा व वयोगटातील एखादा तरुण बेपत्ता आहे का याचीही माहिती घेतली मात्र पोलिसांच्या हाती काहीच लागले नाही. दोन दिवस उलटून ही पोलिसांना मुळे त्याची ओळख पटविण्यात अपयश आले होते. दरम्यान विवेकानंद चौक पोलिसांना सदर मयत तरुणाचा वैद्यकीय अहवाल प्राप्त झाला. वैद्यकीय अहवालावरून सदरील तरुणाचा खून झाल्याचे निष्पन्न झाले. यावरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्याने अज्ञात आरोपी विरोधात अज्ञात कारणासाठी खून केल्याची सरकारी फिर्यादीवरून गुरनं ७८/२०२५ क. १०३ (१) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासाला गती दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या हाती देण्यात आले. विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी मयताची ओळख पटवण्यासाठी एक पोलिसांचे विशेष पथक तयार केले. या पोलीस पथकात सपोनि पंकज शिनगारे, वसंत मुळे, पोउपनि अनिल कांबळे, दगडु बुक्तारे, पथकामधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, रवी गोंदकर, राणा देशमुख, संजय बेरळीकर, रमेश नामदास, रामचंद्र गुंडरे, आनंद हल्लाळे, अझहर शेख, इसा शेख, पोलिस उपनिरीक्षक केंद्रे, यांचा समावेश करण्यात आला. तसेच काही खास खबर यांची मदत घेतली. या पोलिस पथकाने घटनास्थळ परिसर व विवेकानंद चौक पोलीस ठाणे हद्दीतील सर्व स्लम एरिया पिंजून काढला. मात्र कोठेच सदरील इसमाची ओळख पटली नाही. मयताची ओळख पटवण्यासाठी विवेकानंद चौक पोलीस धडपडत होते. अशातच एक खास खबऱ्याकडून सदरील मयत तरुण हा बीड जिल्ह्यातील नेकनूर येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली. खबऱ्याने दिलेल्या पक्या खबरी आधारे विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे एक पथक बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी रवाना झाले. तेथील पोलिसांच्या मदतीने दर्गा रोड परिसरात राहाणाऱ्या सय्यद पाशा त्यांचे घर गाठले. तेथे राहत असणाऱ्या लोकांना सदरील मयताचा फोटो दाखवला. तेव्हा तेथील लोकांनी हा मयत इसम नजीर पाशा सय्यद असल्याची माहिती दिली. अशा पद्धतीने विवेकानंद पोलिसांना मयताची ओळख पटविण्यात यश आले. विवेकानंद चौक पोलिसांनी नजीर पाशा सय्यद यांच्या नातेवाईकांची भेट घेतली. त्यांच्याकडे अधिक माहिती घेतली असता नजीर पाशा सय्यद हा गेल्या सहा महिन्यापूर्वी लातूर येथे कामानिमित्त आला असल्याची माहिती समोर आली. तसेच तो अविवाहित असून तो एकटाच लातूरमध्ये राहात असल्याचेही पोलिसांना कळाले. तसा मयत नजीर सय्यद हा हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करत होता तसेच ज्या खानावळीत किंवा हॉटेलमध्ये काम करत होता तेथेच तो संध्याकाळी राहत होता त्यामुळे लातूरमध्ये त्याचे कुठलेही राहण्याचे ठराविक ठिकाण नव्हते अशी ही माहिती पोलिसांच्या हाती आली. एवढी माहिती घेत लातूर विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस पथक लातूरमध्ये दाखल झाले. लातूरमध्ये दाखल होत नजीर पाशा सय्यद याच्याबद्दलची अधिक माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. नजीर पाशा सय्यद हा लातूर मधील वेगवेगळ्या खानावळीत काम केल्याची माहिती समोर आली. लातूर मधील कुठल्याच खानावळीत तो कायम वेटर म्हणून काम करत नव्हता. चार-पाच दिवस एखाद्या खानावळीत काम करायचा व तेथील काम सोडून परत दुसऱ्या खानावळीत कामाला लागायचा असा त्याचा नित्यनेम होता. त्यामुळे अशा व्यक्तीला कोणी का मारेल याचा विचार विवेकानंद पोलिसांना पडला होता. विवेकानंद चौक पोलिसांना नजीर सय्यद याचा मारेकऱ्यांना शोधणे आता कठीण झाले होते. विवेकानंद पोलीस ठाण्याचे पथक वेगवेगळ्या दृष्टिकोन समोर ठेवून नजीर सय्यद याचा मारेकर्याचा शोध घेत होते. स्थानिक गुन्हे शाखेत काम केल्याचा अनुभव असलेले पोहेका रवी गोंदकर, खुर्रम काजी, नामदास,गणेश यादव, यशपाल कांबळे, यांच्यासह अन्य पोलीस कर्मचारी आरोपीचा माग काढण्यासाठी आपले कौशल्य पणाला लावत होते. अशातच एक खास खबऱ्यांने पोलीस पथकाला एक महत्वपूर्ण माहिती दिली. नजीर सय्यद जेव्हा लातूरमध्ये आला होता तेव्हापासून त्याला त्याचा एक मित्र वारंवार भेटत असल्याची माहिती समोर आली. तसेच तो लातूर मधील खणी भागात राहात असल्याचेही खबर यांनी सांगितले. या माहितीवरून विवेकानंद चौक पोलिसांच्या पथकाने लातूर शहरातील खनि भागात सापळा लावून नजीर सय्यद खून प्रकरणातील संशयित आरोपी सतीश भीमराव वाघमारे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. त्याला पॉलिसी खात्यावर दाखवतात त्यांनी आपल्या गुण्याची कबुली घेऊन सांगण्यास सुरुवात केली. सतीश भिमराव वाघमारे हा बीड जिल्ह्यातील केज तालुक्याच्या धारूर गावचा रहिवासी होता. तो लागेल तिथे काम करायचा. थोडाफार शिकलेला सतीश भिमराव वाघमारे हा बिगारी म्हणून काम करत होता. तो गुन्हेगारी पार्श्र्वभूमीचा होता. दरम्यान एकदा नेकनुर येथे बिगारी कामानिमित्त गेल्यानंतर नजीर पाशा सय्यद त्याच्याशी त्याची ओळख झाली होती. या ओळखीचे नंतर मैत्रीत रूपांतर झाले. नजीर पाशा सय्यद आणि सतीश भीमराव वाघमारे हे दोघेही आता चांगले मित्र झाले होते. मात्र सतीशचे आई-वडिलांसोबत जमत नसल्याने तो आपल्या तीन मुलासह काही वर्षांपूर्वी लातूर येथे कामानिमित्त आला होता. सतीश भीमराव वाघमारे जरी लातूर वास्तव्यात असला तरी नजीर पाशा याच्याशी त्याची नेहमीच बोलले होत होते. नजीर पाशा सय्यद हा अविवाहित होता. त्यामुळे त्याला घरची चिंता नव्हती. नजीर पाशा असंच भटकत भटकत कधी ह्या धाब्यावर कधी त्या खानावळीत काम करत होता. दरम्यान गेल्या सहा महिन्यापूर्वी तो लातूर येथे कामानिमित्त आला होता. नजीर सय्यद लातूरमध्ये आल्याची माहिती सतीश वाघमारे याला मिळाली होती. आपला जुना मित्र लातूर आल्यामुळे सतीश वाघमारे त्याला भेटण्यासाठी आला होता. त्यातूनच त्यांची आर्थिक देवाण-घेवाण देखील झाली होती. लातूरात काम मिळेपर्यंत नजीर सय्यद यांनी सतीश वाघमारे यांच्याकडून काही पैसे उसने घेतले होते. काम मिळाल्यास तुझे पैसे तुला परत देतो असा वादा नजीर सय्यद याने सतीश वाघमारे याला केला होता. दरम्यान चार-पाच महिने उलटून ही नजीर सय्यद आपले पैसे देत नसल्यामुळे सतीश वाघमारे त्याच्याकडे पैशाचा तगादा लावत होता. नजीर सय्यद याच्याकडे पैसे असूनही तो आपल्याला पैसे देत नाही असा समज सतीश वाघमारे असा झाला होता. या कारणातून सतीश आणि नजीर यांचे अनेकदा वादपण झाले होते. दरम्यान ६ फेब्रुवारीच्या रात्री नजीर सय्यद आणि सतीश वाघमारे यांच्यात पैश्यावरून कडाक्याचा वाद झाला होता. नजीर सय्यद याला बघून घेण्याची धमकी सतीश वाघमारे यांनी दिली होती. दरम्यान ६ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी च्या मध्यरात्री बाभळगाव नाकात ते बसवेश्वर चौक जाणाऱ्या रिंग रोडवर असलेल्या ताहीर बिर्याणी हॉटेलच्या बाजूस नजीर सय्यद एकटा बसला होता. तेव्हा तिथे सतीश वाघमारे आला व त्यांनी पैशाची मागणी केली. नजीर यांनी नकार देताच सतीश वाघमारे यांनी त्याच्या वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर भांडणात झाले. अगोदरच गुन्हेगारी पार्श्र्वभूमी असणाऱ्या सतीश वाघमारे यांनी बाजूचा दगड उचलून नजीर सय्यद यांना मारण्यास सुरुवात केली. या मारहाणीत नजीर याला डोक्यात गंभीर दुखापत झाल्याने डोक्यातून आणि डोळ्याच्या खालच्या बाजूस रक्ताची धार येण्यास सुरुवात झाली. काही क्षणातच नजीर सय्यद हा जमिनीवर कोसळला. नजीर जमिनीवर निचपित पडल्याचे पाहून तिथून सतीश वाघमारे यांनी पलयान केले. विवेकानंद चौक पोलिसांनी या खून तपासात महत्त्वपूर्ण बाबी हस्तगत केली असून पुढील तपास विवेकानंद पोलीस ठाण्याची पोलीस निरीक्षक संतोष पाटील हे करीत आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी (लातूर शहर) रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंदचे सपोनि पंकज शिनगारे, वसंत मुळे, पोउपनि अनिल कांबळे, दगडु बुक्तारे, पथकामधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, रवी गोंदकर, राणा देशमुख, संजय बेरळीकर, रमेश नामदास, रामचंद्र गुंडरे, आनंद हल्लाळे, अझहर शेख, इसा शेख, पोलिस उपनिरीक्षक केंद्रे, पोलिस निरीक्षक अशोक अनंत्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमीतकुमार पुणेकर, पोलीस अंमलदार धनंजय गुट्टे, शैलेश सुडे, गणेश साठे, अंजली गायकवाड यांनी केलेली आहे.

24 FEBRUARY TO 02 MARCH 2025 - Page 5 (CRIME SANDHYA)_Layout 1 24-02-2025 16:31 Page 1

सेंट थॉमस हायस्कूलच्या दहावीच्या तुकडीचा सुवर्णमहोत्सवी विद्यार्थी स्नेहमेळावा

वसई/प्रतिनिधी

सेंट थॉमस हायस्कूल, देवतलाव, (१९७५ बॅच ११वी) सुवर्णमहोत्सवी विद्यार्थी स्नेहमेळावा १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मर्सेस, वसई येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. शाळेचे माजी प्राचार्य दिवंगत फादर बर्नड भंडारी यांच्या कडक व शिस्तप्रिय मार्गदर्शनाखाली तावून सुलावून निघालेले विद्यार्थी शाळा सोडल्यानंतर आपल्या ध्येयपूर्तीसाठी वेगवेगळ्या वाटेने निघून गेले. उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, आय.टी.आय., स्वतःचा व्यवसाय, डीएड तर काहींनी व्रतस्थ जीवनाची वाट धरली. अश्या तब्बल १०५ माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत परस्परांशी हितगुज करीत, आपल्या शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. वेगवेगळ्या वाटेने विखुरलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न काही माजी विद्यार्थ्यांनी सुरू केला. बऱ्याच वर्षांनंतर भेटत असल्यामुळे काहींची ओळख नीट लागत नव्हती, सर्वांचे पत्तेही बरोबर माहीत नव्हते व सर्वांना एकत्र आणणे फार कठीण वाटत होते परंतु काही वर्ग मित्रांच्या अथक प्रयत्नांना यश येऊन जवळपास १२५ माजी विद्यार्थ्यांचा व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला. चेहरे एकमेकांना बरोबर ओळखत नव्हते पण मनं जुळली आणि त्यामुळेच या सुवर्णमहोत्सवी मेळाव्यात १०५ जणांनी नाव नोंदणी केली. सुवर्णमहोत्सवाची सुरुवात बाळ येशू चर्च, मर्सेस येथे सकाळी ८:३० वाजता पवित्र मिस्सा अर्पण करून करण्यात आली. आमचे वर्गमित्र फादर बार्थोल मच्याडो, फादर विन्सेंट परेरा व ब्रदर जॉन परेरा यांनी मिस्सा साजरी केली. मिस्सामध्ये फादर बार्थोल मच्याडो यांनी मार्गदर्शनपर प्रबोधन केले. सकाळी साडेदहा ते एक वाजेपर्यंत स्टेज कार्यक्रम आयोजित केले होते. सुशीला डायस हिने स्वागत गीत गाऊन कार्यक्रमास सुरुवात केली. आमच्या बॅचचे दोन फादर्स, एक ब्रदर्स, सिस्टर वेरोनिका अथाईत व सिस्टर नातालीया यांचा फुल व गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला. आमची वर्गमैत्रिण सिस्टर रेचल ही मध्य प्रदेश येथे कामात व्यस्त असल्यामुळे येऊ शकली नाही. फादर विन्सेंट परेरा हे बडोदा, सिस्टर नातालिया ही कल्याण ,सिस्टर वेरोनिका ही उत्तन, फादर बार्थोल मच्याडो हे कुर्ला व ब्रदर जॉन परेरा हे गोव्यामधून खास कार्यक्रमासाठी हजर राहिलेले होते, त्यामुळे कार्यक्रमाची उत्सुकता सिगेला पोचली होती. तसेच कार्यक्रमासाठी आमचे माजी शिक्षक डी बी. सर, त्यावेळचे हेड क्लार्क मार्शल सर हेही उपस्थित होते. वरील मान्यवरांस फुल व गिफ्ट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांचाही पटावर हजेरी घेऊन प्रत्येकास फुल व गिफ्ट देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात वरील मान्यवरांनी उत्कृष्टपणे मार्गदर्शन केले. ब्रदर जॉन परेरा यांनी वेगवेगळे प्राणी व पक्षी यांचे हुबेहूब आवाज ऐकवून सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नेक्टन लेमॉस, अहवाल व जमा खर्च प्रेसिला डिसोजा हीने सादर केला. विन्सेंट आल्मेडा व स्टॅनी रॉड्रीक्स यांनी मनोगत व्यक्त केले. जवळजवळ सर्वांनीच या वयात संघटित राहून वेळोवेळी सहली किंवा स्नेहसंमेलन भरवून जास्तीत जास्त वेळा एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. सुशीला हिच्या फिल्मी स्टाईल गाण्याने व फादरांच्या आशीर्वादाने स्टेज कार्यक्रमाची सांगता झाली. जेवणानंतर विविध इनडोर खेळाचे आयोजन रंजना हिने केले. त्यातील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. आपले वय विसरून सर्वच जण अगदी युवकासारखे व उत्साहाने त्यात सहभागी झाले होते. संध्याकाळी दोन तास बँड पथकाच्या तालावर सर्वच विद्यार्थ्यांनी अगदी मनोसोक्त नाच गाणी केली त्यामुळे आनंद व उत्सहाचा अगदी परमोच्च बिंदू गाठला गेला. संध्याकाळी चहा व स्नॅक्स घेऊन एकमेकांना आलिंगन देत हसत खिदळत सर्वांचा निरोप घेतला. अशा प्रकारे कार्यक्रमाची रूपरेषा त्याचे आयोजन नियोजन व सादरीकरण अगदी उत्कृष्टरित्या करून एक आगळावेगळा आठवणीत राहील असा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला.

स्वयंतक पाटील याने अर्नाळा ते वसई जलतरण सुमारे २२ किलोमीटरचे अंतर ६ तास २१ मिनिटांत केले पार



वसई/प्रतिनिधी

महाराष्ट्र साहसी क्रीडा प्रकारातील खाडी पोहणे या क्रीडा प्रकाराचा महाराष्ट्र शासनाच्या सर्वोच्च शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारात समावेश केलेला आहे. या क्रीडा प्रकारांतर्गत येत्या शिवछत्रपतींच्या जयंतीचे पवित्र औचित्य साधून, उमेळमानचा कुमार स्वयंतक पंकज पाटील ह्याने दि.१९ फेब्रुवारी २०२५, बुधवार या दिवशी अर्नाळा किल्ला ते वसई किल्ला हे सुमारे २२ किलोमीटर अंतर अवघ्या ६ तास २१ मिनिटांमध्ये जलतरण करून पार केले आहे. 'महाराष्ट्र स्टेट मेचर एक्केटिक असोसिएशन'च्या अधीपत्याखाली हा साहसी उपक्रम आयोजित करण्यात आला होता. जलतरणाची सुरुवात पहाटे ७ वाजता अर्नाळा किल्ला येथून झाली, तर शेवट दुपारी १ वाजून २५ मिनिटांनी वसई किल्ला येथे झाला. त्याने हे अंतर अवघ्या ६ तास २१ मिनिटांमध्ये पार केले.यावेळी 'महाराष्ट्र स्टेट मेचर एक्केटिक असोसिएशन' या संस्थेचे अधिकारी उपस्थित होते. वय आठ वर्ष असलेला छोटा स्वयंतक आगरी समाज विकास शिक्षण संस्थेच्या शाळेत इयत्ता तिसरीमध्ये शिकत आहे. स्वयंतकला प्रशिक्षक राकेश कदम यांचे मार्गदर्शन लाभले असून, त्याला अगदी लहानपणापासूनच पोहण्याची आवड निर्माण झाल्याचे प्राध्यापिका असलेल्या त्याची आई डॉ. लतिका पंकज पाटील यांनी सांगितले. या सहासी व रोमांचक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी, तसेच त्यास प्रोत्साहन व आशीर्वाद देण्यासाठी जलतरणप्रेमीनी यावेळी मोठया संख्येने हजेरी लावली.

बारावीची परिक्षा देणाऱ्या डमी विद्यार्थ्यांला पोलिसांनी केली अटक

वसई/प्रतिनिधी

१२वी परिक्षा देण्यासाठी आलेल्या एका तोतया 'विद्यार्थ्याला' पेल्हार पोलिसांनी अटक केली आहे. अहमद खान असे या तोतया विद्यार्थ्याचे नाव आहे. नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथील एका परिक्षा केंद्रात हा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे ज्या अरबाझ कुरेशी या विद्यार्थ्यासाठी तो परिक्षा देण्यासाठी आला होता तो राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या विद्यार्थी सेनेचा अंबरनाथ शहर प्रमुख आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षांना सुरुवात झाली

आहे. सोमवारी भौतिकशास्त्र विषयाचा पेपर होता. अंबरनाथ शहरातील काही तोतया विद्यार्थी नालासोपारा येथील परिक्षा केंद्रावर परिक्षा देण्यासाठी येत असल्याची माहिती मनसेच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. त्यानुसार दुपारी त्यांनी संशयित विद्यार्थ्याचा पाठलाग केला. हा विद्यार्थी पेल्हार येथील ओमसाई छाया ज्युनिअर कॉलेज मधील परिक्षा केंद्रावर आला. कार्यकर्त्यांनी त्याची माहिती परिक्षा केंद्र प्रमुखांना दिली. हा तरुण तोतया असल्याचे निष्पन्न झाले. त्याचे नाव अहमद खान असून तो अरबाझ कुरेशी या विद्यार्थ्यांचा पेपर सोडविण्यासाठी आला होता. याबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. पोलिसांनी अहमद खान याला ताब्यात घेतले. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप राख यांनी दिली. अरबाझ खान विद्यार्थी अंबरनाथ येथील आहे.

दाजी म्हात्रे यांच्या पुण्यतिथी निमित्त आरोग्य शिबीर संपन्न

वाडा/प्रतिनिधी

वाडा शहरातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय उपक्रमात हिरीरीने भाग घेणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बळीराम यशवंत (दाजी) म्हात्रे यांच्या चतुर्थ पुण्यतिथी निमित्त गुरुवारी (दि २० फेब्रुवारी) वाडा शहरातील गणेश मैदान येथे मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वाड्यातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व आणि श्रीगणपती आंबामाता मंदिराचे संस्थापक अध्यक्ष बळीराम यशवंत म्हात्रे (दाजी) यांचे तीन वर्षापूर्वी अल्पशा आजारपणामुळे दुःखद निधन झाले त्या निमित्त

साई होमिओपॅथीक कॉलेज आणि सदुरू नित्यानंद होमिओपॅथीक रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार शिबिराचे आयोजन केले होते. सर्वसामान्य लोकांना उद्भवनाऱ्या विविध आरोग्य समस्यांवर मोफत उपचार करण्यात आले या आरोग्य शिबिराचा तीनशेहून अधिक नागरिकांनी लाभ घेतला असल्याची माहिती दाजी म्हात्रे यांचे चिरंजीव व पत्रकार महेश म्हात्रे यांनी दिली. या प्रसंगी रजनी बळीराम म्हात्रे, डॉ. सुधीर म्हात्रे, नितीन म्हात्रे, महेश म्हात्रे व समस्त म्हात्रे परिवार उपस्थित होते.

कोनसई येथील घर जळून लाखो रुपयांचे नुकसान

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यातील कोनसई गावातील एका शेतकऱ्याच्या घराला रात्रीच्या सुमारास आग लागल्याने राहते घर जळून खाक झाले आहे. कोनसई गावातील शेतकरी नंदकुमार यादव मोकाशी व बाळकृष्ण यादव मोकाशी या दोघा भावंडांचे घर असून कामानिमित्त बाळकृष्ण मोकाशी हे वाड्यात राहतात तर नंदकुमार मोकाशी हे आपल्या कुटुंबासह येथे राहात होते. रात्री साधारण दीड वाजताच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असल्याचे बाळकृष्ण मोकाशी यांनी सांगितले. घराचे छत कौलारू असून जास्तीत जास्त लाकडांचा वापर केला होता. त्यामुळे आगीने थोड्याच वेळात रौद्र रूप धारण केल्याने बघता बघता घर व घरातील कपडे, अन्नधान्य, कपाट, टेबल संसारोपयोगी साहित्य सर्व काही जळून राख झाले. रात्री तीन वाजताच्या सुमारास वाडा नगरपंचायतची अग्नी शामक दलाची गाडी आली

त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले मात्र तो पर्यंत होत्याच नव्हतं झालं. नंदकुमार मोकाशी यांचा संसार सध्या उघड्यावर पडला असून त्यांनी शासकीय दरबारी मदतिची हाक दिली आहे. या दुर्घटनेत २५ लाख रुपयांच्या आसपास नुकसान झाले असल्याचे बोलले जात आहे. सकाळी तलाठी व ग्रामसेवक यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असल्याची माहिती बाळकृष्ण मोकाशी यांनी दिली आहे.

वाड्यातील गादी कंपनीला भीषण आग

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यातील गांध्रे गावातील एका बनवणाऱ्या कंपनीला रात्री भीषण आग लागली असून यात कंपनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. गांध्रे गावाच्या हद्दीत असलेल्या अजय पटेल यांच्या उमा गादी कंपनीला शॉर्ट सर्किट मुळे आग लागली असून सदर कंपनीत ज्वलणशील पदार्थ असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले होते. वाडा नगरपंचायतच्या अग्निशमक दलाची गाडी घटनास्थळी पोहचली होती त्यांनी आग विझविणचे अथक प्रयत्न केले मात्र फोम व ज्वलणशील पदार्थ असल्यामुळे बघता बघता संपूर्ण कंपनी जाळून खाक झाली आहे. वाडा पोलिसाही तात्काळ हजर झाले होते. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

विरार येथून अल्पवयीन मुलीचे अज्ञात इसमाकडून अपहरण!

विरार/प्रतिनिधी

विरार पश्चिमेकडील बोळींज पोलीस ठाण्यात हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमा करून कोणतेतरी आमिष दाखवून फूस लावून पळून नेल्याची घटना घडली आहे. बोळींज पोलीस ठाणे गुन्हा दाखल केला असून याचा तपास पोलीस करीत आहे. रूपा महेश वाघेला राहणार इंद्रवती भवन संजीवनी हॉस्पिटल शेजारी विरार पश्चिम हिने तक्रार दिली की माझी मुलगी कुमारी खुशी महेश उगरेजा-वाघेला वय १७ वर्ष ही अल्पवयीन मुलगी कोणास मी काही न सांगता कोणीतरी अज्ञात इसमानी आमिष दाखवून

व फूस लावून पळून नेले असल्याचे संशयातून व ती अद्याप पावती घरी आली नाही म्हणून तिच्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. मुलीचे वर्णन आहे. गोरा चेहरा गोल नाक सरळ काळे केस लांबी उंची पाच फूट बांधामध्ये अंगात नेसूरी निळ्या रंगाच्या टॉप व निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट पायात चप्पल असे परिधान केले आहे. याबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास अथवा कळल्यास बोळींज पोलीस ठाण्यात कळवावे. या गुन्ह्याचा तपास सह. पोलीस निरीक्षक वैभव जगताप करीत आहेत. बोळीज पोलीस ठाणे संपर्क क्रमांक ८४२१३७५४८०.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

कार्यकारी अभियंता पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचे कार्यालय

पत्ता : सुर्या प्रकल्प वसाहत मनोर, ता.जि. पालघर ४०१ ४०३. ई मेल पत्ता : eepidpalghar@gmail.com दुरध्वनी : +९१ ८००७३३५३७३

दर मागणी पत्रक सूचना क्र. /०२/२०२४-२५

कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर पिन कोड क्र. ४०१ ४०३ दुरध्वनी क्रमांक +९१ ८००७३३५३७३ हे अनुभवी व इच्छुक संस्थेकडून खालील नमूद परिशिष्ठातील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी दरपत्रक मागवित आहेत. सदर दरपत्रके हे इच्छुक संस्थेने शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून दि. २४/०२/२०२५ पासून दि. ०३/०३/२०२५ पर्यंत डाऊनलोड करून दि. ०५/०३/२०२५ रोजी ऑनलाईन किंवा हस्ते/ पोस्टाने सादर करावीत. कोणतेही कारण न देता दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके स्विकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. अट असलेली दरपत्रक स्विकारली जाणार नाही.

Name of Work :- Providing Erosion Protection with Tech Revetment Technology over the wier situated in Surya river Dist. Palghar

Sr. No.	Description of Item	Unit	Rate (Rs.)
1.	Design and Supply of Articulating Cabled Block (Uniform) mattress thickness varies from 200mm to 400mm, made from woven geotextile fabric form with reinforcing galvanized steel cables on both direction as per the detailed design, thickness and technical specifications. The mattress shall be customized as per site geometry or profile at factory in the form of panels along with geotextile baffles and one panel shall be connected with the adjacent panel by using Industrial Zipper. Cables shall be of minimum 6mm diameter and the breaking strength of the cable shall not be less than 30kN. Including wastage and shrinkage.	Sq.m	
2.	Placing of Articulating Cabled Block mattress thickness varies from 200mm to 400mm, with labour and machineries. Laying and installation of articulating cable Block mattress along with drainage decomposition (Drain Tube), including all manpower, machineries, tools, lead and lift. This applicable for slope and apron complete, as per drawing and specifications and as directed by Engineer- in -charge.	Sq.m	
3.	Providing, Supplying and Pouring of Grout in Articulating Block Fabric Form using Grout mix, that mix shall exhibit a minimum compressive strength of 20 N/mm at 28 days, when made and tested in accordance IS: 516. The sand/cement ratio shall be determined by the ready-mix manufacturer and shall be on the order of 2.4:1. The water/cement ratio shall be determined by the ready-mix manufacturer, but generally shall be on the order of 0.7 along with suitable grout pumping aid, including underwater divers for fixing the Fabric Form in position as per approved drawings or as per the directions of Engineer - in - Charge.	Cum	
4.	Supply and Installation of perforated pipe drainage geo composite using Drain tube (Geotextile is 550gm/sqm, 1mini-drain pipe every one meter width ways) drainage geo composite for drainage purpose. The Drain tube consists of a filter layer, drainage mat and mini pipes of 20mm diameter@1m center to center spacing. The mini pipes have two perforations per corrugation at 180° and alternating at 90, at a gradient of i = 1 having in plane flow capacity of 1L/s/m under 400kPa during 100h testing. Design shall be as per IRCSP102 and MORTH3100. Including wastage and shrinkage.	Sq.m	
5.	Supplying & Installing of soil anchor having anchor head of 1.4 MT capacity (Cast confirming to is 1865:1991) and dimension of 160mm x 57mm x 50mm ((Lx WxH) driven and prestressed using anchor strand constructed of 7x19 core having 8mm diameter, ultimate load of 35 kN and working load of 23 kN used for stabilization of slope or any existing structure as per detailed design including bearing plate of 200mm x 200mmx10mm. All components shall be hot-dip galvanized (zinc weight minimum 500 grams per sqm).	Nos	

१. दरपत्रक केवळ अंदाजपत्रक बनविण्याच्या उद्देशाने मागविण्यात आलेले आहे. दरपत्रक निविदेची किंवा कामाची हमी देत नाही.

२. कामाबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास ती आपणांस कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि.पालघर कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. नमूद केलेले दर हे करांसहित असावेत.

जा.क्र.पापावि/भांशा/५३०/सन २०२५, दि. २०/०२/२०२५
कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचे कार्यालय
सूर्या प्रकल्प वसाहत, मनोर, ता. जि. पालघर ४०१४०३.

सही/-
(यो.बा. पाटील)
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे विभाग, मनोर

विमाका/कोवि/२०२४-२०२५/३५०

24 FEBRUARY TO 02 MARCH 2025 - Page 6 (CRIME SANDHYA)_Layout 1 24-02-2025 16:32 Page 1

पान ३ वरून....

संशयामुळे संसाराची वाताहात झाली...

लावून दिलं. हिरा बैसाणे हा मोलमजुरी करत असे. तुटपुंजा पैसा मिळत असला तरी अनिता काटकसरीने आपला संसार करत असे. हिरा दिवसभर काबाडकष्ट करून सायंकाळी घरी आला की नाकीडोळी नीटनेटकी असणारी अनिता ही लडीवाळपणे हिराशी बोलायची. तिच्या बोलण्याने हिरा आपला दिवसभराचा आपला थकवा विसरून जायचा. मर्यादित उत्पन्न होतं, पण गरजाही मर्यादित असल्याने संसारात ताण-तणाव जाणवत नव्हता. अनिताचा मोठा भाऊ गौतम अनितावर खूप प्रेम करायचा. अनिताचं लग्न झाल्यानंतर तिचा विरह सहन होवू नये म्हणून अनिता ज्या परिसरात रहात होती. तिथे तो रहात असेआणि दररोज वेळ काढून तिची विचारपूस करत असे. दरम्यान अनिता-हिरा यांना एक मुलगी झाली. भूमी तिचे नाव ठेवण्यात आले. पहिली मुलगी झाल्याने हिरा दुखावला होता, पण अनिता मात्र खुष होती. ती याबद्दल हिराची समजूत काढत असे. 'होईल हो मुलगा आपणांस' असे ती म्हणत असे. आता अनिता दुसऱ्यांदा गरोदर राहिली. आता आपणांस मुलगा होईल अशी अपेक्षा हिराची होती म्हणून परिस्थिती नसतांनाही तो आपल्या बायकोला काय हवे? काय नको? ते पहात असे, पण दुसरं अपत्यही मुलगीच झालीतेव्हा मात्र हिरा कमालीचा नाराज झाला. अनितालाही यावेळी मुलगा होईल अशी अपेक्षा होती, पण मुलगी झाल्याने तीही नाराज झाली. तिच्या हातात काय नसल्याने तिने आपल्या मनाला समजावले. मुलाची अपेक्षा ठेवणाऱ्या हिराचा मात्र हिरमोड झाला होता. अनिताचा काहीही दोष नसतांना, तिला तो याविषयी दोष देवू लागला. त्यात नातेवाईक भर घालू लागले. एक तरी मुलगा हवाच असे ते अप्रत्यक्षपणे तिला डिवचत असत. गरोदरपणात अनिताची सर्व प्रकारची काळजी घेणारा हिरा आता अनिताची काळजी तर सोडाच, पण तिची साधी विचारपूस करणं टाळू लागला. त्याचं ते वागणं अनिताला खटकू लागलं. सुरूवातीला अनिता त्याला समजावण्याच्या सुरात त्याला विश्वासात घेण्याचा प्रयत्न करत होती, पण हिरा अनिताचं बोलणं मनावर न घेता उलट तिला प्रत्येक क्षणाला डिवचू लागला. अनिताही हिराच्या अशा विक्षिप्त वागण्याने दुखावली. दोघांमध्ये निर्माण झालेले कटुत्व दोघांच्या भवितव्याच्या दृष्टीने घातक होतं, पण त्यांना समजावणारं कुणी नव्हतं. अनिताचा मोठा भाऊ गौतम अनिताची-हिराची समजूत घालण्याचा प्रयत्न करत असे, पण दोघांच्या लेखी गौतमचं बोलणं कस्पटासमान होतं. अनिता आणि हिरा या दोघांमध्ये होणारे बाद हे भविष्यात घातक ठरतील म्हणून गौतम नेहमी चिंतेत असायचा. कालांतराने हिरा हा दारूच्या आहारी गेला. बायकोशी होणारा बाद असह्य होत होता म्हणून हिरा दारूच्या आश्रयाला गेला, पण हे न पटण्यासारखे असल्याने हिराचे नातेवाईक त्याला दोष देत असत, त्याला समजावून सांगत, पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. अनिताही त्याच्या या व्यसनावर नाराज होती. आता दोघांतील अंतर वाढूच लागले होते. हिरा दारूच्या आहारी गेल्याने त्याच्याकडून काम होत नसे. तो काम न करताच घरी बसून रहात असे. अनिताला नाईलाजास्तव काम-धंद्यासाठी बाहेर पडावं लागलं.ती धुणी-भांडी करून चरितार्थ चालवू लागली. सकाळी ९ वाजता ती घराबाहेर पडत असे आणि दुपारी दोन वाजता ती घरी येत असे. कामाला जाण्याआधी घरातील सर्व कामे आटोपून, स्वयंपाक पाणी करत असल्याने ती कामावर गेल्यावर तिचा नवरा हिरा आणि दोन मुली घेवून घेत असत, त्यासाठी अनिताला दररोज सकाळी लवकर उठायला लागत असे. दारूड्या हिराकडून काम होता नसल्याने अनिताला घराबाहेर पडावं लागलं खरं, पण ते काही हितशत्रूना पहावत नव्हतं. एकाने हिराच्या मनात विष पेरलं. अनिता ही पैशासाठी बाहेरख्यालीपणा करत नसेल कशावरून? असा किडा हिराच्या डोक्यात शिरला आणि हिरा दारूमुळे विचारशक्ती गमावून बसल्यामुळे तो संशयाने पछाडला. अनिता दिवसभर काबाडकष्ट करतअसे. रात्री त्यामुळे ती थकून जात असे. रात्री जेवणानंतरची उष्टी भांडी साफ करून घेतल्यानंतर ती झोपेने येरायची, अंथरूणावर पडल्या पडल्याच तिला झोप येत असे. अशावेळी हिरा जवळ आला की त्याला ती झटकून द्यायची. रात्री आपली बायको आपल्याला जवळ घेत नाही म्हटल्यावर इतर जण आपल्याला तिच्याबद्दल जे काही सांगतात ते खरेच असावे असे. त्याला वाटू लागले. तिचा इतरांशी संबंध असावा म्हणूनच ती आपल्याला झोपतांना जवळ येवू देत नाही अशा प्रकारचा संशय हिराच्या मनात वाढू लागला. आता तो बायकोचा द्वेष-मत्सरकरू लागला. तिला शिवीगाळ करू लागला. कामाला जाण्यापासून रोखू लागला. मी कामावर गेले नाही तर संसार कसा चालायचा? असे ती म्हणू लागली. आपल्या नवऱ्याचा विरोध झिडकारत ती कामासाठी घराबाहेर पडत असल्याने हिराला मनस्वी तिचा राग येत असे. ती कामासाठी घराबाहेर पडू लागली की तो तिला घाणेरड्या शिव्या देत असे, पण अनिता त्याकडे दुर्लक्ष करून कामावर जात असे. घरातील सर्व कामे आटोपून, स्वयंपाक पाणी करून अनिता कामासाठी घराबाहेर पडली, नेहमीप्रमाणे हिराने तिला विरोध केला. अनिताने त्याचा विरोध झिडकारला. सवयीप्रमाणे हिराने अनिताला घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करत 'आज तू माझे ऐकले नाहीस तर आज तुझागेमच करतो' अशी उघड-उघड धमकी दिली. 'रोज मरे त्याला कोण रडे' या म्हणीप्रमाणे हिराचे हे नाटक दररोजचे झाले असे म्हणत व त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत अनिता नेहमीप्रमाणे आपल्या कामावर निघून गेली. घरात असलेल्या भूमी आणि साक्षी या दोन मुलींनी हे आईचं आणि बाबांचं दररोजचं नाटक आहे असे म्हणत हिराच्या धमकीकडे दुर्लक्ष केलं. अनिता घराबाहेर पडल्यानंतरही हिरा बडबड करत होता. माझं ऐकत नाहीस का? आज तझा गेम करणारचं? त्या दरम्यान नेहमीप्रमाणे अनिताचा भाऊ गौतम सहजच अनिताच्या घरी आला. गौतमला पाहून हिराचा संताप अधिक अनावरझाला. आज तुझ्या बहीणीचा गेम करणारचं म्हणून शिव्या दिल्या. हे दररोजचं रडगाणं असल्यामुळे गौतमनेही त्याकडे दुर्लक्ष केले आणि तो निघून गेला. गौतम घरी गेल्यानंतर हिरा ही घराबाहेर पडला व काही वेळाने झिंगतच घरी आला. मद्यप्राशन केलेला हिरा घरात आल्यापासून अनिताला शिव्या देतच होता. आज तुझा शेवटचा दिवस. आज तुझा गेम करणारच!' अशी त्याची बडबड चालू होती. दुपारी दोन वाजण्याची वेळ, सुर्य आग ओकत होता. उन्हाच्या दहशतीमुळे रस्ते सुनसान होते. अशा अवस्थेत हिरा घराबाहेर पडला व जातांना भूमी आणि साक्षी या दोन मुलींना बजावून गेला. 'आजतुमच्या आईचा शेवटचा दिवस. आज तिचा मी गेम करणारच!' आज सकाळपासून आईचा गेम करणार. या हिराच्या तोंडून निघणाऱ्या शब्दाने भूमी आणि साक्षी धास्तावल्या होत्या. दारूच्या नशेत बाबांनी आपल्या आईचं बरे- वाईट केलं तर? दोघींनी त्यांच्या घराजवळ रहाणाऱ्या मामाच्या ज म्हणजे गौतम बिन्हाडेच्या घरी स धाव घेतली. बाबा आता एवढ्या उन्हात घराबाहेर पडले व आईचा आज गेम करणारच असे म्हणत होते असे मामाला सांगितले. मामा अर्थात गौतमसुद्धा धास्तावला. त्याने तडक कपडे बदलले व तो हिराच्या दिशेने झेपावला.साक्री रोडच्या फुलेनगर परिसरात रहाणारी अनिता आपले धुणे-भांड्याचे काम आटोपून पांझरा नदीच्या पात्राशेजारील समांतर रस्त्यावरून रणरणत्या उन्हात, तळपणाऱ्या सुर्याच्या चटक्यांनी बेजार होत छत्रपती हॉस्पिटलच्या व बारिया पेट्रोल पंपाच्या बाजूने चालत येत असतांनाच अनिताचा नवराहिरा तिला आडवा झाला. हिराचा त्या क्षणाचा तो अवतार पाहून अनिता आतून हादरली, पणहिंमत करून हिराला बाजूला ढकलतती चालू लागली.अनिताच्या या वागण्याने हिरा अधिकच चेकाळला. त्याने सोबत आणलेला करवतीची धार असलेला भाजी कापण्याचा सुरा पैंटच्या खिशातून काढला आणि क्षणाचाही विलंब न लावता अनिताला घट्ट पकडून, उभ्या उभ्याच तळपत्या सुर्याच्या साक्षीने तो धारदार सुरा अनिताच्याकोवळ्या मानेवर फिरवून तिचागळा कापून काढला. गळा कापला गेल्याने अनिताच्या तोंडातून हुंकारही न निघता रक्ताच्या थारोळ्यात ती रस्त्यावरच कोसळली. त्या दरम्यान धापा टाकत अनिताचा भाऊ तिच्या मदतीसाठी धावत घटनास्थळी पोहोचला, पण तोपर्यंत अनिताचा गेम झाला होता. आपली बहीण रक्ताच्या थारोळ्यात पडलेली पहाताच गौतमला भोवळ आली आणि तोही जमिनीवर कोसळला. दरम्यान हल्लेखोर हिरा याने तेथून पळ काढला.हे अघोरी कृत्य प्रत्यक्ष पहाणाऱ्या एका पादचाऱ्याने तात्काळ पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनशी संपर्क साधला आणि एका महिलेचा उभ्या उभ्या गळाकापत खून करण्यात आल्याचे त्याने सांगितले. भरदिवसा तळपत्या उन्हात निर्जन रस्त्यावर महिलेचा उभ्या उभ्या गळा कापून खून झाल्याची बातमी कळताच पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ हे त्यांच्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. मृत महिलेच्या भोवती जमा झालेली गर्दी पांगवून सहाय्यकपोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी धर्मेद्र मोहिते, चंद्रशेखर नागरे, मनोहर पिंगळे, पुरूषोत्तम सोनावणे आर्दीनी अनिताच्या मृतदेहाचा आणि घटनास्थळाचा पंचनामा केला. ज्या धारदार करवती सुऱ्याने तिचा खून झाला होता सुरा घटनास्थळी पडला होता, तो सुरापोलिसांनी जप्त केला. दरम्यान सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश रेड्डी हे आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अधीक्षक श्रीकांतधिवरे आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली अनिताचा मृतदेह जिल्हा शासकीय रूग्णालयात रवाना करण्यात आला. पोलीस अधीक्षक श्रीकांतधिवरे यांच्या आदेशाने त्याच क्षणी हल्लेखोर हिरा वाल्मिक बैसाणे याला तात्काळ ताब्यात घेण्याची मोहिम राबवण्यात आली असता केवळ अर्ध्या तासातच हल्लेखोर हिरा बैसाणे हा याच परिसरातीलएका मंदिरामध्ये अत्यावस्थ अवस्थेत आढळून आला. त्याच्या तोंडातून उग्र वास येत होता. त्याने विषप्राशन केल्याचा संशय संबंधित पोलीस यंत्रणेला आल्याने त्याला कागदोपत्री अटक दाखवून जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. मयत अनिता बैसाणे हिचा भाऊ गौतम प्यारचंद बिन्हाडे हा औषधोपचारानंतर शुद्धीवर आला. त्याने पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनला हिरा वाल्मिक वैसाणे याच्याविरूद्ध फिर्याद दाखल केली. त्या आधारे हिरा वाल्मिक बैसाणे याच्याविरूद्ध भा.दं.वि. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनच्या कस्टडीत असलेल्या हिरा बैसाणे याला अत्यावस्थ अवस्थेत उपचारार्थ जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. विषप्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या हिरा वैसाणेवर जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू असतांना त्याचीही प्राणज्योत मालवली. अविचारी आणि संशयी स्वभावामुळे हिरा वैसाणे याने आपल्या सुखी संसाराची राखरांगोळी करवून घेतली. स्वतः प्राणाला मुकला. बायकोला मारले आणि निष्पाप मुलींना निराधार बनवले. शेवटी गौतम मामावर या दोघी भाचींना सांभाळण्याची जबाबदारी येवून पडल्याची खंत आप्तस्वकीय व्यक्त करू लागले आहेत.

शेतामधील अँगल भलत्यानेच काढून ...

घशाखाली उतरवून, अंगणातील झाडाखाली पडलेल्या खाटेवर संतोष झोपला. विजय आपल्या कामात मग्न झाला, दोन तास निघून गेले. सावली असलेल्या झाडाखाली ऊन आले, दुपारचे तीन वाजले. संतोष झोपलेला होता, त्याच्या तोंडावर माशा घोंगावत होत्या. चेहऱ्यावर व डोळ्यावर घोंगवणाऱ्या माशा मात्र वेगळ्याच अघटीत घटनेची जाणीव करून देत होत्या. विजय बाहेरून आल्यावर अंगणात झाडाखालीपडलेले ऊन, उन्हातही गाढ झोपलेला भाऊ आणि त्याच्या अंगावर घोंगावणाऱ्या माशा पाहून विजयच्या मनात कोलाहल सुरू झाला. घाबरून विद्युतवेगाने बिजयने संतोषला उठवण्याचा प्रयत्न केला. आवाज देऊनही संतोष उठत नसल्याने विजय घाबरला. त्याने आरोळी ठोकत गावकऱ्यांना गोळा केले. नातेवाईकांनी एकच आक्रोश केला. पोलीस पाटीलांनी पोलिसांना माहिती दिल्याने डोणगाव ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक नागरे यांनी सहकाऱ्यांसह २० मिनिटात घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी विजय खंडारे याच्या अंगणातगावकऱ्यांनी एकच गर्दी केली होती. पोलिसांना पहाताच गर्दी हळूहळू पांगत होती. खाटेवर झोपलेल्या संतोषचा मृत्यू झालाहोता. सहाय्यक पोलीस निरीक्षक नागरे यांनी रूग्णालयात कॉल करून रूग्णवाहिका बोलावली. घटनास्थळ पंचनामा व इतर कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून संतोष खंडारेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मेहकर रूग्णालयात पाठवण्यात आला. संतोष खंडारेचा मारहाणीत मृत्यू झाल्याची खबर वाऱ्यासारखी गावात पसरल्याने एकच खळबळ निर्माण झाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नागरे यांनी त्वरित आरोपींना ताब्यात घेतले. विजय नामदेव खंडारे (वय ३५) यांच्या फिर्यादीवरून संतोष खंडारे याच्या खून प्रकरणी डोणगाव पोलिसांनी आरोपी नितेश खंडारे, सतिश त्रिकाळ, पवन वाघमारे, पवन राठोड या चौघांविरूद्ध अप. क्र. २८४/२४ कलम १०३(१), ३ (५), भारतीय न्याय संहितेसह कलम ३(२), ३(त) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. मेहकर न्यायालयासमोर आरोपींना उभे केले असता न्यायालयाने चौघांनाही दहा डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. शवविच्छेदन झाल्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात संतोष खंडारे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आरोपींना पोलीस कोठडीत घटनेबाबत विचारणा केल्यावर चोरीच्या संशयावरून संतोषला अमानुषपणे केलेल्या बेदम मारहाणीत बळी गेल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात उघड झाले. मेहकर तालुक्यातील डोणगाव पोलीस स्टेशनअंतर्गत येत असलेले विष्वी हे जेमतेम लोकसंख्येचा गाव. या गावात संतोष नामदेव खंडारे (वय ३८) कुटुंबासह रहायचा. त्याच्या कुटुंबात पत्नी, २ मुली, मुलगा, वडील होते तर एक विवाहित लहान भाऊ वेगळा रहात होता. दारूच्या कमालीचा आहारी गेलेला संतोष खंडारे मिस्त्री काम करायचा. दारू पिण्याचे त्याला व्यसन जडल्याने काम-धंदा न करता तो नेहमीच दारूच्या नशेत असायचा. गावात लहान-सहान चोरी झाली तर नागरिक संतोष याच्यावर संशय घेत होते. गावाशेजारी असलेल्या कणका बुद्रुक येथील पवन राठोड याचे विष्वी गावाशेजारी शेत होते. त्याच्या शेतातील अँगल काही दिवसांपूर्वी चोरीस गेले होते. शेतातील चोरीस गेलेले लोखंडी अँगल संतोष खंडारे यानेच लांबवल्याचा पवनला संशय आला होता. पाच डिसेंबर रोजी पवन राठोड याने त्याचे मित्र सतिश त्रिकाळ, पवन वाघमारे, नितेश खंडारे यांना गावाजवळील स्मशानभूमीजवळ बोलावून घेतले. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास संतोष खंडारे यासही तेथेच बोलावले. मित्रांसमोर पवनने संतोषला प्रश्न केला की, तू माझ्या शेतातील अँगल चोरले का? त्यावर मी अँगल चोरले नसल्याचे संतोष याने ठामपणे सांगितले, तेंव्हा तो खोटे बोलत असल्याचा समज करून घेऊन पवन राठोडसह त्याच्या मित्रांनी संतोष यास काठ्यांनी हात, पाय, पोटरी, छातीवर, पाठीवर जबर मारहाण केल्यामुळे संतोष कावराबावरा झाला. त्याला काही सुचत नव्हते, वेदनेने तो विव्हळत होता. संतोषला बेदम मारहाण केल्यावर नीट चालता येत नसल्याने नितेश खंडारे याने गंभीर जखमी संतोषला घरी सोडले. घरी गेल्यावर काही मिनिटात संतोषचा मृत्यू झाला. चोरीच्या संशयावरून संतोषचा बळी गेला, त्याच्या चिमुकल्या मुलांचे पितृछत्र हरवले. चोरी केल्याचा संशय होता तर तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशन होते, मात्र कायदा हातात घेऊन शेवटी कोणाचा फायदा होत नाही हेच या घटनेवर स्पष्ट होत आहे. या घटनेचा तपास बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील, डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमर नागरे, पोलीस हेडकॉन्स्टेबल दिगंबर चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक संदीप सावळे, पोलीस कॉन्स्टेबल आनंद चोपडे, पवन गाभणे, पोलीस चालक कुंडलिक वाढले हे करत आहेत.

दारूच्या नशेत भलतेच बोलून फसला...

लागला. येथे काम करीत असताना त्याने अनेकांशी आपली मैत्री जमवली. सोनगिरवाडी येथील शाकीर खान आणि वाई परखंदी येथील प्रणित गायकवाड याच्याशी त्याची खास मैत्री जमली. हे तिघे ही कुठे काम करीत असले की रात्री दारू प्यायला हमखास जमत होते. त्याची दारूची जेवणाची पार्टी महिन्यातून आठवडयातून होत होती. या पार्टीत कोण कोणाला दारू पाजतो याचे गणित ते घालत नव्हते. मैत्रीत कसला व्यवहार म्हणून ते दिल खुलासपणे एकमेकावर खर्च ही करीत असत.त्यातच राज अरूणकुमार सिंग याचा भाऊ अश्विनी सिंग हा ही अलिकडेच वाई येथे कामासाठी आला.तो जरी राज बरोबर राहत असला तरी तो त्याच्या बरोबर किंवा त्याच्या मित्राबरोबर दारू प्यायला बसत नव्हता.तो आपण भले आपले काम भले म्हणून भाडयाने घेतलेल्या खोलीत रात्रीच्या वेळी दारू पिऊन झोपत होता. राजला मात्र दारू पिण्यासाठी मित्रांचा घोळका लागत होता. त्यामुळे जवळचे मित्र भेटले की, त्याची दारूची पार्टी रंगत होती. अलिकडे राज याचे सोनगिरवाडी येथे काम चालू होते. वाई आणि सोनगिरवाडी हे जवळ असल्याने वाई येथून ही त्याच्यासोबत दारू पिण्यास त्याचे मित्र येत होते. खरे तर दारूचे व्यसन हे वाईटच परंतु अनेकजण काबाड कष्टाचे काम केल्यानंतर शिणवटा घालविणेसाठी दारूचा घोट आपल्या घशाखाली रिचवित असतात.त्याची ही रोजचीच सवय बनून जाते, दारूची नशा अंगात भिनली की, एकमेकावर कुरघोडी किंवा एकमेकांला लागेल असे बोलून विनाकारण भांडण आपल्यावर ओढावून काही जण घेत असतात. राज याला ही कामाचा शिणवटा घालावासा वाटू लागला की, मित्रांच्या समवेत दारू प्यायला बसायचा त्याला समोरच्याची चेष्टामस्करी करण्याची सवय होती. त्यामुळे तो दारूच्या नशेत कोणाबरोबर ही काही ही अशिल्ल बोलत असायचा. काही ही उध्दट बोलून भांडण उकरून काढण्याची त्याला घाण सवय होती. दारूच्या नशेत तो कायम दुसऱ्यावर दादागिरी करीत हमरी तुमरीवर यायचा परंतु दुसऱ्या दिवशी परत सगळे काही विसरून परत कामाला लागायचे हे त्याचे नित्याचेच झाले होते. जहा चार यार मिल जाए म्हणून परत कभी खुशी कभी गम म्हणत तो मित्राच्याबरोबर रमत ही होता. दारू पिल्यानंतर समोरच्याला डिवचणे एवढेच त्याला जमत होते. आपण परराज्यातून लांब महाराष्ट्रात पोटा पाण्यासाठी आलो आहोत याचे त्याला भान नव्हते. दारूची नशा अंगात भिणली की, तो कोणाशीही पंगा घ्यायचा. त्यामुळे त्याचे मित्र ही त्याचेवर चिडत होते. ते त्याला दारूडया, बेवडया म्हणून बोलवित त्याची फिरकी घेत होते. तरी ही तो लागज सोडून समोरच्या व्यक्तीची चेष्टा मस्करी करीत होता. त्यामुळे चेष्टामस्करीतून काय अघटित घडते किंवा त्याचे परिणाम काय होतील याची जाणीव त्याला नव्हती. प्रणित गायकवाडने तर त्याला बऱ्याच वेळेला सांगितले होते की तु माझी चेष्टामस्करी करीत जावू नकोस, मला चेष्टा केलेली आवडत नाही असे बाजवले होते तरी ही राज दारू प्यायल्या नंतर त्याची चेष्टा मस्करी करीत होता. मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी सोनगिरवाडी जवळील बाभळीच्या वनात राज सिंग, प्रणित गायकवाड,शाकीर खान,विनोद सांळुखे, हर्षवर्धन कारेकर हे सर्वजण दारू प्यायला बसले. राज आणि प्रणित गायकवाड यांनी नेहमी प्रमाणे दिड दिड क्वॉटर घेतली.तर शाकीर, विनोद आणि हर्षवर्धन यांनी दोन दोन बियर घेतली. रात्रीच्या ९ ते १०च्या सुमारास त्याची पार्टी रंगात आली. प्रत्येकाला दारूची झिंग ही चढली होती. सर्वजण एकमेकाला शिव्या देत चेष्टा मस्करी करीत होते. त्यातच शाकीर आणि हर्षवर्धन यांच्यात मागच्या भांडणावरून वाद झाला. त्यात शाकीर याने हर्षवर्धन याच्या कानफटी त मारल्याने हर्षवर्धन हा पार्टी सोडून निघून गेला. त्यानंतर परत राज, प्रणित आणि शाकीर याच्यात चेष्टामस्करीतून वाद सुरू झाला. राज याने प्रणित याच्याबाबत काही तरी अश्लिल टिप्पणी केली. त्यामुळे प्रणित हा राजवर भडकला. राजला तुला दारू जास्त झाली आहे तु जरा तोंड आवर असे तो म्हणाला. परंतु त्याची चेष्टामस्करीतून फिरकी घेण्याची लहर आल्याने राज हा काही सरायला तयार नव्हता.त्याच्यातील वाद विकोपाला जात असल्याचे बघून विनोद साळुंखे याने त्याची भांडणे मिटविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी रागाच्या भरात असणाऱ्या प्रणित याने विनोद याला ही मारहाण केल.त्यामुळे तो ही तेथून निघून गेला. एकंदर दारूच्या पार्टीचा रंगाचा बेरंग झालेला होता. समोर होत असलेली वादावादी बघून तरी राज हा शांत होईल असे प्रणित याला वाटत होते. परंतु तो काही शांत होत नव्हता. दारू जास्त झाल्यामुळे त्याची जीभ वाकडी तिकडी वळत होती. त्यातच त्याने प्रणित गायकवाड याच्या घरच्या माहिलांच्या बाबत काही तरी अश्लिल टिप्पणी करून चेष्टामस्करी केली.ही बाब प्रणित याला खपली नाही. त्याला राजचा भयंकर राग आला. हर्षवर्धन आणि विनोद यांनी बियर संपवून बाटल्या तिथेच टाकल्या होत्या.ते प्रणित याच्या नजरेत आली. चेष्टामस्करी करणाऱ्या राजचा त्याला आधीच राग आलेला होता. त्याने रिकाम्या पडलेल्या बाटल्या त्याने उचलल्या आणि नशेत असलेल्या राजच्या डोक्यात जोरात हाणल्या. आधीच नशेत असणारा राज सिंग हा ओरडतच खाली पडला. त्याचे डोके फुटले. त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. त्यातच शाकीर खान याने बाजुलाच पडलेला बांबु घेतला आणि राज सिंग याच्या डोक्यात घातला.त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर प्रणित आणि शाकीर हे दोघे जण तेथून दुचाकी गाडीवरून पळून गेले.त्यानंतर पहाटे ३ वाजणेच्या सुमारास विनोद याने मयत राज सिंग याचा भाऊ अश्विनी सिंग याला सांगितले की, त्याचा भाऊ राज सिंग हा सोनगिरवाडी येथील बाभळीच्या वनात याचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असून त्याचा खून प्रणित गायकवाड आणि शाकीर खान यांनी केला आहे. अश्विनी सिंग याला या घटनेची माहिती मिळाल्यावर त्याने तातडीने सोनगीरवाडी येथील बाभळीच्या वनात जावून पाहिले. तेथे त्याला त्याचा भाऊ राज सिंग हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. त्याच्या डोक्यात बिअयरच्या बाटल्या फोडलेल्या दिसल्या. त्याच्या बाजुलाच रक्ताने माखलेला बांबु पडलेला होता. तसेच घटनास्थळी दारूच्या बियरच्या बाटल्या,स्नॅक्स आणि चप्पल पडलेले होते. अश्विनी सिंग याने या घटनेची माहिती वाई पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच ते ही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. मृतदेह उतरीय तपासणीसाठी वाई येथील सरकारी रुग्णालयात दाखल केला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत राज सिंग याचा भाऊ अश्विनी सिंग याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी तपास सुरू केला. या घटनेचा तपास वाई पोलीसाबरोबर सातारा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी ही सुरू केला. या घटनेतील संशयीत आरोपी हे घटनास्थळावरून परखंदी घाटातील डोंगर आणि मांढरदेवी घाटातील डोंगरात लपून बसल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी मिळाली. त्यांनी या डोंगर रांगा पंजून काढत संशयीत प्रणित गायकवाड आणि शाकीर खान यांना ताब्यात घेतले. त्यांना वाई पोलीसांच्या ताब्यात दिल्यावर वाई पोलीसांनी त्याचेकडून या घटनेची माहिती घेतली असताना ते दोघे ही पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होते. पोलीसांनी त्यांना पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत राज सिंग याचा भाऊ अश्विनी सिंग याने दिलेल्या फिर्यादीवरून राज अरूणकुमार सिंग (वय २६) याच्या खुन प्रकरणी प्रणित गायकवाड (वय २५) रा.परखंदी वाई आणि शाकीर खान (वय २४) रा. सोनगीरवाडी वाई याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. या दोघांना वाई पोलीसांनी वाई येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला लाकडी बाबु आणि फोडलेल्या बियरच्या बाटल्या जप्त केल्या. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे शाखचे प्रमुख सुधीर वाळुंज, हवा.मदन वरखंडे,प्रसाद दुदुस्कर,श्रावण राठोड, हेमंत शिंदे, विशाल शिंदे, धीरज नेवसे, विशाल येवले,राम कोळी, नितीन कदम, रूपेश जाधव, गौतम दाभाडे यांनी केला.

अनैतिक संबंधात जेंव्हा अडथला ...

तुकारामकडून भागेना म्हणून ती बाहेर सावज शोधत होती. अशातच तिची नजर ही गावातील गणपती कांबळे या तरूणावर पडली. तो ही मिळेल ते काम करीत असल्याने कधी कधी तो तुकाराम याच्या शेतात कामाला येत होता. तेथेच दोघे ही एकमेकांच्या संपर्कात आल्यावर मोबाईल फोन नंबरची देवघेव झाली. त्यांनतर दोघे ही फोनवरून रोज तासन तास बोलत होते. दोघांना ही भेटण्याची इच्छा होत होती. तशी संधी दोघांना ही मिळत नव्हतीफोनवरून बोलताना सिध्दव्वाच्या मनात काय आहे हे गणपतीने चांगले ओळखले होते. एकदा त्याने तिला बाहेर भेटायला बोलविले. तशी ती ही आपल्या माहेरी जातो असे नवऱ्याला सांगून बाहेर त्याला भेटायला आली. ते दोघे ही जवळच्या गावातील एका लॉजवर भेटले. त्या लॉजवरील रूममध्ये त्या दोघांनी मनसोक्तपणे शरीर सुखाचा आनंद घेत मज्जा लुटली. खरे तर रात्रीच्या बेडवरच्या खेळात तिचा नवरा कमी पडत असल्याने आज तिची गरज ही गणपती कांबळेने पुर्ण केली, त्यावेळेपासून त्या दोघांचे संबंध वाढीस लागले. गणपती हा ३०शीतील तरूण तर सिद्धव्वा ही ३२शीतील तारूण्याने मुसमुसलेली. तिची जवानी ओसांडून वाहत होती. गेल्या दोन वर्षांपासून ती त्याच्या नादाला लागलेली होती. त्या दोघांच्या संबंधाची कुणकुण ही शेजाऱ्यांना लागलेली होती. तशी चर्चा गावात आणि शेजाऱ्यात होत होती. ही चर्चा तिचा नवरा तुकाराम याच्या कानावर आल्यावर त्याने या गोष्टीचा जाब पत्नी सिध्दव्वा हिला विचारला. त्यावेळे तिने कानावर हात ठेवत मी नाही त्यातील बाई असे म्हणत माझे कोणाबरोबर बाहेर कसले ही लफडे नाही असे नवऱ्याला सांगितले. तिच्या सांगण्यावर तुकारामने ही विश्वास ठेवला नव्हता. तो त्या दोघांच्यावर नजर ठेवून होता. आपली बायको गणपती कांबळेच्या नादाला लागलेली आहे हे त्याच्या ही लक्षात आलेले होते. तो हल्ली या कारणातून रोज दारू पिऊन बायको बरोबर भांडण काढत मारहाण करीत होता. ती मार खायला निगरघट्ट असल्याने त्याचा मार खाऊन ती गप्प बसत होती पण बाहेर गणपती याला भेटायचे काही सोडत नव्हती. आपले लफडे नवऱ्याला समजले आहे, त्यामुळे ती आता सर्तक झालेली होती.तुकाराम हा हल्ली तिला बाहेर कुठे ही सोडत नव्हता. तरी ही ती यातून काही तरी मार्ग काढून गणपतीला भेटायला जात होती. तुकारामच्या बाबतीत देखणी बायको ही दुसऱ्याची असते तसेच त्याचे झाले होते. तिला बाहेर प्रियकर गणपतीची चटक लागलेली असल्याने ती हल्ली नवऱ्याला काहीच किमंत देत नव्हती. भांडणात ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवून त्याला खिजवत होती. तु कमी पडतोस म्हणून मी बाहेर ठोक्या ठेवला आहे हे ती त्याला स्पष्ट शब्दात सुनावत होती. यातूनच नवरा बायकोची भांडणे फार विकोपाला गेलेली होती. भांडणात तुकाराम हा तिला तु त्याचा नाद सोडला नाहीस तर मी तुला जिवंत ठेवीत नाही असे सांगत होता. ती ही त्याला त्याच ठोक्यात सांगत होती की,एक वेळ मी तुला सोडेन पण प्रियकर गणपतीला सोडणार नाही. नवरा बायकोची भांडणे बऱ्याच वेळेला पै-पाहुण्यांनी सोडविण्याचा प्रयत्न करून दोघांना ही समजावून सांगितले होते. परंतु तिला आता नवरा नकोच असल्याने ती मात्र वेगळ्याच विचारात होती. तिने प्रियकर गणपती कांबळे याला देखील सांगून टाकले की, तुला मी जर पाहिजे असेन तर माझ्या नवऱ्याला आधी मारून टाक आपल्या मार्गातील अडसर दुर कर तो ही या कामाला तयार झाला. तिने त्याला आपल्या जवानीची झलक दाखविलेली असल्याने तो ही तिच्या जवानीला भुललाच होता. त्यामुळे त्या दोघांनी ही तुकारामला मार्गातून कसे बाजुला काढता येईल याचा विचार करून तसा प्लॅन केला. त्यातच सिध्दव्वाने नवरा तुकाराम हा बाहेर गावी गेला असल्याने त्या कामासाठी गणपतीला बोलावून घेतले.प्रियकर गणपती घराकडे आल्यावर तिने घराचा दरवाजा आतून लावून घेतला. तसे शेजाऱ्याच्या हे लक्षात आले. त्या दोघांचा घरात तो कार्यक्रम चालू असता एका शेजाऱ्याने बाहेरून घराच्या दरवाज्याला कडी लावली. त्यामुळे घरात असलेल्या त्या दोघांना बाहेर पडता येत नव्हते. त्यावेळी संध्याकाळच्या वेळेला बाहेर गावी गेलेला तुकाराम हा लवकर परत आला.त्यावेळी शेजाऱ्यांनी त्याच्यासमोरच घराची कडी काढून त्या दोघांना रंगेहात पकडून दिले. त्यावेळी तुकाराम हा गणपती कांबळे याला मारायला गेला असता सिध्दव्वाने त्याची सोडवणुक करून त्याला पळून जायला मदत केली. त्यावेळी तुकाराम याने बायको सिध्दव्वाला मारहाण करीत तिला तिच्या माहेरी पाठवून दिले. ती ही रागाच्या भरात माहेरी निघून गेली खरी परंतु तिच्या डोक्यात मात्र वेगळाच विचार सुरू होता. गावासमोर आपल्याला बदनाम करणाऱ्या आपल्या नवऱ्याला आता सोडायचे नाही त्याला कायमचा धडा शिकवायचा याचा तिने विचार करून मध्यस्थी मार्फत नवरा तुकाराम याची माफी मागून ती परत त्याच्याकडे राहयला आली. ती आल्यावर परत तिने दोन तीन दिवसांनी म्हणजे बुधवार दि.५ फेब्रुवारी २०२५ रोजी तिने प्रियकर गणपती कांबळे याला रात्रीच्या सुमारास घरी फोन करून बोलावून घेतले.त्या रात्री तुकाराम हा घरच्या बायकोच्या लफडयाने फुल्ल दारू पिऊन घरी आलेला होता. घरी आल्यावर त्याने नेहमीप्रमाणे बायकोबरोबर भांडण काढले. त्यावेळी घरात गणपती हा होताच.त्याला बघून तर तुकाराम हा जास्तच चिडला. भांडणात त्या दोघांनी तुकारामला खाली पाडून लाथा बुक्कायांनी मारले. तो दारूच्या नशेत असल्याने त्याना शिव्या देण्या शिवाय तो काही करू शकत नव्हता. त्याचवेळी सिध्दव्वाने कन्नडमध्ये गणपती याला डिवचले. याला मारून टाक असे कन्नडमध्ये सांगितले. त्यासरशी गणपती याने बाजुलाच पडलेला मोठा दगड उचलला आणि खाली पडलेल्या तुकारामच्या डोक्यात दोन वेळा जोरात हाणला. त्यासरशी त्याचे डोके फुटले. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला.त्याचा जागीच मृत्यु झाला.त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्या दोघांनी ही त्याचा मृतदेह एका पोत्यात भरला आणि ते पोते सिध्दव्वा ही प्रियकर गणपती कांबळे याच्या दुचाकी गाडीवर मध्ये घेऊन बसली. रात्रीच्या अंधारात त्या दोघांनी त्याचा मृतदेह बुवाची सौंदती येथे आणून कृष्णा नदीच्या पात्रात टाकला. त्यानंतर ते दोघे ही आल्या वाटेने बस्तवाडला निघून आले. दुसऱ्या दिवशी बुवाची सौंदती येथील लोकांना कृष्णा नदीच्या पात्रात एक पोते तरंगत असल्याचे दिसले. काही जणांना याची शंका आल्याने त्यांनी या घटनेची माहिती जवलच्या रायबाग पोलीस स्टेशनला दिली. रायबाग पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत कृष्णा नदी पात्रातून ते पोत बाहेर बाहेर काढले असता त्या पोत्यात एका इसमाचा मृतदेह असल्याचे दिसून आले. पोलिसांनी तांत्रीक दृष्टया तपास करीत मृतदेहाची ओळख पटवली. मृतदेह हा बस्तवाड येथील आण्णासाहेब उर्फ तुकाराम ओलेकर याचा असल्याची ओळख पटली. पोलीसांनी घटना स्थळी मयत तुकाराची बायको सिध्दव्वा हिला बोलावून घेतले. तिने आपल्या नवऱ्याचा मृतदेह ओळखून पोलीसांना वेगळीच माहिती सांगितली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करीत मृतदेह उतरीय तपासणीसाठी अंकली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रत पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत तुकाराम याच्या बायकोचे म्हणजे सिध्दव्वाचे बस्तवाड येथील गणपती कांबळे याच्याबरोबर अनैतिक संबंध असून या संबंधाला मयत तुकाराम याचा विरोध असल्याने सिध्दव्वानेच आपल्या भावाचा खून केला असल्याची माहिती मयत तुकाराम याची बहिण महानंदा तोरणवर हिने रायबाग पोलीसांना दिली. तिने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी सिध्दव्वा हिला ताब्यात घेऊन तिच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना ती पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होती. तिच्या बोलण्यात पोलिसांना विसंगती आढळून येत असल्याने महिला पोलीसाकरवी सिध्दव्वा हिला पोलीसी खाक्या दाखविला असता तिने आपले गणपती कांबळे याच्या बरोबर असलेले विवाहबाहय संबंध मान्य करून प्रियकर गणपती कांबळे याच्या मदतीने नवरा तुकाराम याच्या डोक्यात दगड घालून खून केल्याचे सांगितले. नंतर त्याचा मृतदेह कृष्णा नदी पात्रात टाकल्याचे कबुल केले. तिने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेतील तिचा प्रियकर गणपती कांबळे याला देखील ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला.

या घटनेची फिर्याद मयत तुकाराम याची बहिण महानंदा तोरणकर हिने दिल्याने पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून आण्णासाहेब उर्फ तुकाराम ओलेकर (वय ४०) याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी त्याची पत्नी सिध्दव्वा ओलेकर (वय ३५) तिचा प्रियकर गणपती कांबळे (वय ३४) या दोघांच्या विरोधात रायबाग पोलीस ठाण्यात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला दगड आणि दुचाकी जप्त केली.या घटनेचा पुढील तपास रायबाग पोलीस करीत आहेत.

पान ८ वरून....

विकास करताना स्थानिकांचा आधी...

तसेच त्यांच्या झुंजार पत्रकारिता व समग्र सार्वजनिक चळवळींवर आधारित सादर केलेला माहितीपट लक्षवेधी ठरला. हजारो चाहत्यांची उसळलेली उत्स्फूर्त गर्दी, सुरेख सुत्रसंचलन, महनीय वक्त्यांचे समायोजित भाषणे आणि स्वखर्चाने उभारलेले कार्यकर्त्यांचे यशस्वी आयोजन या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून सभेला संबोधित करताना अँड.नीता कर्णिक म्हणाल्या की, आजोबा यदुनाथ थत्ते ह्यांच्या समाजवादी संस्कारांने मला वकिली पेशाकडे जाणिवेने व जबाबदारीने पाहण्यास शिकविले. सत्तेत राहून खिसा भरण्याची नाही संधी आली असता सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन एखाद्या बिल्डरला ग्रामपंचायतीची घरपट्टी भरायला लावणारे सरपंच मनवेल तुस्कानो खरोखरच ग्रेट आहेत. नागरिकांच्या हितासाठी विरोधातील राजकीय शक्ती विरूद्ध लढणारे ते नीडर लीडर आहेत. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा म्हणाले की प्रत्येक राजकीय पुढारी आध्यात्मिक असावा कारण विचारांचे देखील अध्यात्म असते. अध्यात्म माणसाला सतत पुढे नेत असते. मनवेल तुस्कानो आधी स्वतः आध्यात्मिक आहेत मग ते राजकीय व्यक्तीमत्व आहेत म्हणूनच त्यांना जनसामान्यांची संवेदना कळते.निर्भय जनमंच मधील त्यांचे लेखन संघर्षामधून प्रसवल्यामुळे ते खरे साहित्य आहे. डोळ्यात अंजन घालणारे आहे.चिंतन करायला लावणारे आहे. त्यांच्या प्रखर विचारांचा ओसंडणारा हा धबधबा कुंठीत होऊ न देणे हीच खरी मनवेल साहेबांना अमृतमहोत्सवी वाढदिवसाची शुभेच्छा ठरेल. त्यांचा लढा अजून संपलेला नाही तो पुढे नेऊन यशस्वी होत असल्याचे दाखवून देणे हीच त्यांच्यासाठी दिर्घायुष्याची भेट असू शकते. सत्काराला उत्तर देताना मनवेल तुस्कानो आभार व्यक्त करताना म्हणाले की निष्ठावान कार्यकर्ते, लोकांचा पाठींबा आणि विश्वास या बळावरच मी आजवर कामे करू शकलो.

देवणी येथे शिवजयंती मोठ्या...

आल्यानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाने सांगता करण्यात आले. यशस्वीतेसाठी बाबुराव इंगोले, गोपीनाथ सगर, तानाजी पाटील, प्राचार्य नंदकुमार पटवारी, बस्वराज पाटील, विश्वजीत पाटील, दत्ता आचवलकर, प्राचार्य मांजीबाळे, आर के बिरादार, विनायक पाटील ,डब्ल्यू एस कांबळे, प्राचार्य डॉ रामरतन शिंदे, अविनाश पाटील, सतीश पाटे, शंकरराव बिरादार, यांच्यासह जयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते, लोकजागृती शिक्षण संस्थेचे कर्मचारी आणि शिवभक्त यांनी विशेष परिश्रम घेतले.

24 FEBRUARY TO 02 MARCH 2025 - Page 7 (CRIME SANDHYA)_Layout 1 24-02-2025 16:33 Page 1

लातूरमध्ये बँक कर्मचाऱ्यांची तीव्र निदर्शने

लातूर/प्रतिनिधी

मागील अनेक वर्षापासून बँक कर्मचाऱ्यांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या असलेल्या पाच दिवसांचा आठवडा, पुरेशी नोकर भरती, जुनी पेन्शन योजना यासारख्या अनेक प्रलंबित मागण्या घेऊन युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या वतीने सर्व बँकांमध्ये आंदोलनाची हाक देण्यात आलेली आहे. १४ फेब्रुवारी व २१ फेब्रुवारी रोजी देशभरातील सर्व जिल्हा ठिकाणी व प्रमुख शहरांमध्ये युनायटेड फोरमच्या वतीने निदर्शने करण्यात आली. लातूरमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया चंद्रनगर मुख्य शाखा या ठिकाणी सर्व जिल्हाभरातील कर्मचारी निदर्शनासाठी जमले होते. यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. दीपक माने यांनी संबोधित करताना सांगितले की, ज्या ज्या वेळी यांना वेगवेगळ्या योजना राबवून सत्तेत बसायचे असते त्यावेळी यांना बँक कर्मचारी आणि बँका आठवतात व एकदा सत्तेत बसले की, यांना बँक कर्मचाऱ्यांच्या कुठल्याही प्रश्नाशी काहीही देणे घेणे उरत नाही. मागील दहा वर्षात बँकांचा व्यवसाय कित्येक पटीने वाढलेला आहे. अनेक नवीन शाखा उघडलेल्या आहेत परंतु कर्मचाऱ्यांची संख्या मात्र मागील दहा वर्षांत पूर्वी पेक्षा खुप कमी झालेली आहे. यामुळे कर्मचाऱ्यावरती कामाचा प्रचंड ताण येतो आहे व त्यांचे वर्क लाइफ बॅलन्स पूर्णतः बिघडत चाललेले आहे. यासाठी अग्रक्रमाने सर्व बँकांमधून कर्मचारी व अधिकारी यांची पुरेशा प्रमाणात नोकर भरती करणे व पाच दिवसांचा आठवडा बँक कर्मचाऱ्यांसाठी लागू करणे ही आज काळाची गरज बनलेली असताना सुद्धा केंद्र सरकार जाणीवपूर्वक बँक कर्मचाऱ्यांची ही मागणी दुर्लक्षित करीत आहे. मार्च २०२४ मध्ये झालेल्या द्विपक्षीय करारामध्ये शिल्लक असलेले सर्व मुद्दे सहा महिन्याच्या आत सोडविण्यात येतील असे आश्वासन इंडियन बँक असोसिएशनने सरकारचे प्रतिनिधी म्हणून बँक कर्मचारी संघटनांना दिले होते, परंतु एक वर्षे उलटून सुद्धा राहिलेल्या मुद्द्यासंदर्भात त्यांच्याकडून ब्र सुद्धा काढला जात नाही. सर्व कर्मचारी व अधिकारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सर्व बँकांमधून पी टी एस व शिपाई बंधूंची भरती करण्यात यावी यासह सर्व प्रलंबित प्रश्नांची योग्य दखल घेऊन जर वेळीच ते सोडवले गेले नाहीत, तर २४-२५ मार्च ला बँक कर्मचाऱ्यांना नाईलाजाने संपावर जावे लागेल असा गर्भित इशारा यावेळी कॉ. दीपक माने यांनी दिला. एसबीआयओए चे कॉ. उमेश आडगावकर, ए.आय.बी. ओ.ए.चे कॉ. विवेक पदरे, एन.सी.बी.इ.चे कॉ. अभिषेक बाहेती, नोबोचे बागवान या सर्वांनी उपस्थित समुदायाला याप्रसंगी मार्गदर्शन केले. कॉ. परमेश्वर बडगिरे, कॉ. सदाशिव मुगावे, कॉ. सचिन नंदागवळे, कॉ. भीमाशंकर उटगे, कॉ. महेश गांधले, कॉ. रोहन गरजे, कॉ. रेश्मा भवरे, कॉ. सरिता, कॉ. शामला शुक्रे यासह सर्व बँकां मधून कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

भिवंडीत आगीचे सत्र सुरुच,भंगार गोदामात आगडोंब

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी शहर व ग्रामीण भागात आगींचे सत्र सुरूच आहे.शुक्रवारी सायंकाळी चार वाजता च्या सुमारास तालुक्यातील गुंदवली येथे भंगार गोदामाला आग लागण्याची घटना घडली आहे. गोदामा मध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक चिंध्या व पुठ्ठा प्लास्टिक साठवला असल्याने ही आग मोठ्या प्रमाणात भडकली होती. या आगी मध्ये चार ते पाच गोदाम व चार ते पाच पत्र्याच्या झोपड्या जळून खाक झाल्या आहेत. आगीचे कारण अस्पष्ट असून सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी भिवंडी अग्निशामक दलाची एक गाडी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. परंतु आगीत प्लास्टिक पुठ्ठा चिंधी कपडा साठवला असल्याने आगीचे लोट मोठ्या प्रमाणा वर दिसत असल्याने आगीचा आगडोंब दिसून येत आहे. चार तासांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे.

वसईत वीज चोरांना महावितरणचा शॉक; १ कोटी ५ लाखांची वीज चोरी उघडकीस

वसई/प्रतिनिधी



महावितरणच्या वसई कार्यालयामार्फत विविध ठिकाणी टाकलेल्या धाडीत लाखो रुपयांची उघडकीस आली आहे. विशेष बाब म्हणजे एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या काळामध्ये भरारी पथक व वसई पारनाका कार्यालयाच्या संयुक्तरीत्या कारवाईत १२५ वीज ग्राहकांनी सहा लाख ४२ हजार २०२ युनिटची चोरी केल्याचे आढळून आले आहे. या चोरी केलेल्या युनिटची रक्कम १ कोटी पाच लाख रुपये इतकी असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. मागील काही दिवसांपासून वसई पारनाका कार्यालयाने आयोजित केलेल्या या धाडींमध्ये विविध ठिकाणी चोरीच्या वीज पकडण्यात आल्या. यात विजेच्या मीटरमध्ये फेरफार करणे किंवा सर्विस वायर मधून चोरीचा वीज पुरवठा घेण्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. यामध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये एकूण आठ विज ग्राहकांची वीज चोरी पकडली. यात ३८ हजार ८६ युनिटची वीज चोरी उघडकीस आली आहे. या वीज चोरीची एकूण रक्कम आठ लाख ९५ हजार इतकी आहे. विशेष बाब म्हणजे घाटे आळी परिसरामध्ये एका बंगल्याच्या वीज मीटर मध्ये बेकायदेशीर रित्या फेरफार केल्याचे आढळले. या ठिकाणच्या ग्राहकाने मागील काही महिन्यात सहा लाखांची वीज चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. वसईतील किल्ला बंदर, पाचू बंदर, कोळीवाडा, वाल्मिकी नगर व घाटे आळी परिसरामध्ये ही मोहीम राबवण्यात आली होती. कलम १३५ मध्ये मिटरची छेडछाड करणे, आकडा टाकून विजेचा वापर करणे, सव्हिसवायर टॅप करणे वीज चोरी पकडण्याची मोहीम यापुढेही चालू राहणार आहे. ग्राहकांनी अनधिकृत विजेचा वापर करू नये. असा विजेचा वापर करतांना आढळून आल्यास विघुत कायदयानुसार कडक कारवाई करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत. वीज ग्राहकांनी अधिकृत वीज जोडणी घेवूनच विजेचा वापर करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. आगामी काळात वीज चोरांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात वीज चोरी शोध मोहीम राबविण्याचे निर्देश महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता कृष्णकांत झारकर यांनी दिले आहेत.

अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात 'भारतात व विदेशात उच्च शिक्षणातील संधी' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान

वसई/प्रतिनिधी

विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचा रसायनशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQC) यांच्या संयुक्त विद्यमाने भारतात व विदेशात उच्च शिक्षणातील संधी या विषयावर नुकतेच एका मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी मुंबईच्या सिद्धार्थ महाविद्यालयामधील रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख आणि ऑक्सफोर्ड विद्यापीठामधून पीएच.डी. पदवी प्राप्त करणारे डॉ. नंदकिशोर चंदन हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी आपल्या प्रास्ताविकात आजच्या काळात जगभरात विविध ज्ञानशाखांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी सजगपणे आपली आवड आणि क्षमता यानुसार या संधींचा शोध घ्यावा असे आवाहन केले.

आपल्या व्याख्यानात डॉ. चंदन यांनी भारतातील तसेच परदेशातील उच्च शिक्षणाच्या विविध संधी, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आणि करिअरच्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच अमरावती ते ऑक्सफर्ड हा आपला प्रवास आपण जिद्द चिकाटी कुतूहल आणि दुर्दम्य इच्छाशक्ती यांच्या बळावर कसा साध्य केला याविषयी अत्यंत प्रेरक अनुभवांचे कथन त्यांनी केले. प्रश्नोत्तर सत्रात त्यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन शंकासमाधान केले. विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेच्या सी. आर. राजाणी सभागृहामध्ये झालेल्याल्या या व्याख्यानाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद उबाळे, उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, प्रा.पी.एम.पगारे, प्रबधक दिलीप वर्तक यांच्यासह प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रा विपल दोशी यांनी सूत्रसंचालन केले. वर्तक महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा शामराव साखरे यांनी पाहुण्यांची ओळख आणि आभारप्रदर्शन केले. विद्यार्थ्यासाठी ही माहिती अत्यंत उपयुक्त ठरली, अशा प्रकारचे आणखीही मार्गदर्शनपर कार्यक्रम व्हायला हवेत अशी प्रतिक्रिया उपस्थित विद्यार्थ्यानी दिली.

'राजमाता जिजामाता'ला रावळेंनी दिली पुस्तके भेट

लातूर/प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील शैक्षणिक संलग्रीकरण विभागाचे सहाय्यक अधीक्षक सुनील सीताराम रावळे यांनी येथील राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनाची जवळपास दहा हजार रुपये किमतीची पुस्तके स्वखर्चातून भेट दिली. यावेळी राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी ही पुस्तके स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांच्या हस्ते स्विकारली. यावेळी विद्यापीठातील सहाय्यक अधीक्षक विजय कदम, सहाय्यक अधीक्षक सुनील ढाले, अजिजखान पठाण, ओमकार साळुंके आदी उपस्थित होते. सुनील रावळे हे उपक्रमशील व्यक्तिमत्त्व आहे. अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना ते शिक्षणासाठी मदत देतात. आतापर्यंत त्यांनी अनेक महाविद्यालयांना स्वखर्चातून पुस्तके भेट दिली आहेत. याबद्दल प्राचार्य केंद्रे यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार केला.

किरवली येथील अपघातात एक ठार एक जखमी

वाडा/प्रतिनिधी

वाडा मनोर महामार्गावरील किरवली गावाच्या हद्दीत झालेल्या अपघातात एक तरुण जागीच ठार झाला आहे तर दुसऱ्याला ठाणे येथे अधिक उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. किरवली येथील ओमसाई वजन काटा समोर सकाळी दहा वाजता पालीहून वाड्याच्या दिशेने दुचाकीवरून येत असलेल्या मंदार लक्ष्मण सवर रा. कशिवली व स्वप्नील सुनिल पारधी (१९) रा. गावठान पाडा यांना ट्रक क्रमाक एन.एल.०१ ए.डी. ८६२० ने धडक दिल्याने स्वप्नील पारधी याचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे तर मंदार सवर हा गंभीर जखमी झाल्याने त्याच्यावर वाडा ग्रामीण रुग्णाल्यात प्रथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी ठाणे येथे हळविण्यात आले आहे, तर ट्रक चालकास ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रियांका मांढरे करत आहेत.

HEALTH DEPARTMENT, ZILLA PARISHAD, PALGHAR

Notice for Tender

Oral Cancer Screening Device Purchase

Tender No. 28 Date - 14/02/2025

Health Department, Zilla Parishad Palghar Invites Proposals from reputed and experienced supplier in the competitive bidding process to supply of Oral Cancer Screening Device

For the detailed tender document, interested bidder should visit https://mahatenders.gov.in/ Tender Submission would be online and the deadline to submit the proposal is 03/03/2025 (06:00) pm.

Sd/-	Sd/-
District Health Officer	Chief Executive Officer
Zilla Parishad Palghar	Zilla Parishad Palghar

भिवंडी आयुक्त यांनी घेतला मालमत्ता कर वसुली व स्वच्छता विभागाच्या कामाचा आढावा

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी पालिका आयुक्तपदी भारतीय प्रशासन सेवेतील अनमोल सागर यांची नियुक्ती झाल्या नंतर त्यांनी पालिका प्रशासना च्या विविध विभागांच्या आढावा बैठक घेऊन अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करीत असताना कामात हयगय खपून घेतली जाणार नाही असा सज्जड इशारा दिला आहे. आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी आरोग्य व स्वच्छता विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत आयुक्त यांनी शहरातील सार्वजनिक स्वच्छता, दैनदिन गटार सफाई, जास्त वर्दळीच्या ठिकाणी दिवसातुन दोन वेळा स्वच्छता करणे, सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांची विशेष स्वच्छता करणे, याकामांस प्रथम प्राधान्य देऊन नागरीकांच्या तक्रारी तातडीने निवारण करण्याचे सक्त निर्देश दिले. तसेच मार्केट परिसर आणि जास्त कचरा जमा होणाऱ्या ठिकाणी रात्री देखील साफ सफाई सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सर्व स्वच्छता सफाई कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधन सामुग्रीसह गणवेशात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. यासोबत शहरातील जास्तीत जास्त नागरीकांना वैयक्तिक शौचालय योजनेचा लाभ मिळणेकामी वार्ड निहाय घरांचे सर्वेक्षण करुन वैयक्तिक शौचालय योजनेची जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले. झोपडपट्टी क्षेत्रात कचरा संकलनासाठी मोठे डस्टबीन ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. १०० दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत वार्ड निहाय दैनदिन विशेष स्वच्छता मोहिम तसेच छोट्या गटारांच्या दैनदिन सफाई करीता धडक मोहिम राबवून त्याचे जिओ टेंग फोटो व अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच दर आठवड्यात कामाचा आढावा सादर करण्याचे बंधन अधिकाऱ्यांना घातले आहे. सदर आढावा बैठकीसाठी अति.आयुक्त देविदास पवार, उपायुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, सहाय्यक आयुक्त (आरोग्य) नितिन पाटील, आरोग्य अधिकारी हरीष भंडारी, कार्यलयीन अधिक्षक जे.एम. सोनवणे तसेच सर्व प्रभाग आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक उपस्थित होते. तर मालमत्ता कराच्या वसुली बाबत आढावा बैठक घेतली सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त (कर) देविदास पवार, उपायुक्त (कर) बाळकृष्ण क्षीरसागर तसेच प्रभाग समिती क्र.१ ते ५ मधील सर्व वसुली अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आर्थिक वर्षातील वसुलीचा आढावा घेतला. मीसध्याची एकूण मागणी ८११.१९ कोटी एवढी असुन त्यापैकी मालमत्ता, पाणीपट्टी कराचे उत्पन्न ६४.१० कोटी इतके वसुल झाल्याचा अहवाल उपायुक्त (कर) यांनी दिला. तर १५ दिवसांच्या अभय योजना कालावधीत २१ कोटी वसुली झाली असून ही आज पर्यतच्या इतिहासातील सर्वात जास्त वसुली झालेली आहे.पालिकेची मालमत्ता कराची व पाणिपट्टी कराची एकुण मागणी पाहता वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी प्रमाणात असल्याने आयुक्त यांनी नाराजी व्यक्त केली. कर वसुली वाढवण्याकरिता सर्व संबंधित अधिकारी, लिपिक यांना कर वसुलीसाठी अधिकाअधिक तीव्र कारवाई करणे बाबतचे निर्देश दिले आहेत.

निवृत्त ग्राम विस्तार अधिकारी गजानन काशिद यांचे निधन

वाडा/प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते संजय काशिद यांचे वडील वाडा पंचायत समितीचे निवृत्त विस्तार अधिकारी गजानन काशिद यांचे राहत्या घरी आंबिस्ते (खुर्द) येथे अल्पशा आजाराणे दुःखद निधन झाले आहे. बुधवारी १९ फेब्रुवारी रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी पालघर जिल्ह्यातील विविध तालुक्यात ग्राम विस्तार अधिकारी म्हणून काम केले आहे. ते अत्यंत शांत, संयमी, प्रेमळ, मितभाषी, अजातशत्रू, मनमिळावू व संवेदनशील व्यक्तिमत्व होते. त्यांच्या पश्चात शोकाकुल पत्नी कमळ काशिद, मुलगा संजय काशिद, मुलगी भारती जाधव, मुलगा राजू काशिद, मुलगा कुंदन काशिद, सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधीला ठाणे पालघर जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक असा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. पुण्यनुमोदन आणि शोक सभा कार्यक्रम रविवारी (दि.२ मार्च) वाडा तालुक्यातील त्यांच्या राहत्या घरी अंबिस्ते खुर्द येथे सकाळी १० वाजता संपन्न होणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकां कडून मिळाली आहे.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर

ई-निविदा सूचना क्रमांक -१६५ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०१ (एक) कामे समाविष्ट आहे.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून)	लेखाशिर्ष
१.	तलासरी येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी फर्निचर तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर	रु. ७६५३४७३/-	४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण वरील भांडवली खर्च जिल्हा योजना

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २१/०२/२०२५ ते दि. ०७/०३/२०२५ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. १०/०३/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/१३७१

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) ४०१ ४०४
दिनांक : १२/०२/२०२५

सही/-
(नितीन वा. भोये)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

विमाका/कोवि/२०२४-२०२५/३३३

24 FEBRUARY TO 02 MARCH 2025 - Page 8 (CRIME SANDHYA)_Layout 1 24-02-2025 16:33 Page 1

पालघरमध्ये भव्य 'जय शिवाजी जय भारत पदयात्रा'तून शिवजयंती साजरी

पालघर/प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त पालघरमध्ये भव्य जय शिवाजी जय भारत पदयात्रा काढण्यात आली. ही पदयात्रा तहसील कार्यालय, पालघर येथून जिल्हाधिकारी कार्यालय, पालघरपर्यंत निघालेल्या या भव्य पदयात्रेत जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, तहसीलदार सचिन भालेराव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संगीता भागवत तसेच अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्था, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करून अभिवादन केले. या पदयात्रेच्या माध्यमातून शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा जागर करण्यात आला. या पदयात्रेत शालेय विद्यार्थ्यांनी महाराजांच्या वेशभूषेतून ऐतिहासिक दृश्ये उभी केली, तसेच आकर्षक नृत्य आणि लेझीम पथकाने उत्साह वाढवला. संपूर्ण पालघर शिवमय झाले होते. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या प्रमाणात प्रथमच ही पदयात्रा काढण्यात आली. याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. या प्रसंगी जिल्हा प्रशासनामार्फत सर्व सहभागी नागरिकांसाठी डिजिटल सर्टिफिकेटची सोय केली होती. एक विशेष ठठ कोड स्कॅन करून सर्टिफिकेट डाउनलोड करता येणार आहे. तसेच, सामाजिक बांधिलकी जपत या ठिकाणी रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.ही पदयात्रा यशस्वी करण्यासाठी लाईफ क्लब सफाई संघटनेच्या वॉलंटियर्स आणि लेझीम पथकाने मोलाची भूमिका बजावली.

गौणखनिज भरारी पथकाच्या अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडले

पालघर/प्रतिनिधी

पालघर येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील गौणखनिज भरारी पथकाच्या अधिकार्याला आणि त्याच्या दोन पोलीस बॉडीगार्ड आणि एक खाजगी व्यक्तीला विरार मधील मांडवी पोलीस स्टेशनच्या हद्दीत लाचलुचपत विभागाने लाच स्वीकारताना रंगे हाथ पकडले. पालघर लाचलुचपत विभागाला मिळालेल्या तक्रारीनुसार त्यांनी सापळा रचत ही यशस्वी कारवाई केली. मांडवी पोलिसांना संबंधित अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि खाजगी व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मांडवी पोलीसांनी दिली आहे. पालघर जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैधपणे उत्खनन सुरू आहेत. दुसरीकडे चोरट्या पद्धतीने वाळू तस्करी सुरू आहे. यांच्यावर कारवाई करण्यासाठी भरारी पथक निर्मिती केलेली आहे. त्याच पथक प्रमुखाने कारवाई करण्याऐवजी अशा तडजोडी केल्या जात असल्याचे समोर आले आहे. ज्या भरारी पथकावर गौण खनिजांची तस्करी रोखण्याची जबाबदारी आहे, तेच भरारी पथक अशा पद्धतीने जर तडजोडी करून गौण खनिज तस्करीला अभय देत असेल तर पालघर जिल्ह्यात सुरू असलेली गौण खनिजाची चोरी रोखायची कोणी? हा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

गुरु रविदासांच्या समतावादी विचारांचा धागा मनामनात रूजला पाहिजे -प्रा.डॉ.अनंत राऊत

लातूर/प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्माण करून क्रांती घडवून आणली. ७५ वर्षात आपल्या देशात प्रतीक्रांती सुरु झाली. प्रतीक्रांतिकारी शक्ती विजयी होऊन संविधानाच्या आधारे सत्तेत बसलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर आपल्या परम्परेतील गुरु रविदासाच्या समतावादी विचारांचा धागा मनामनात रुजला पाहिजे, यासाठी प्रचंड काम करावे लागेल, असे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक प्रा.डॉ.अनंत राऊत लातूर येथे केले. गुरु रविदास, छत्रपती शिवाजी महाराज व संत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात जी २४ आयोजित व्याख्यान मालेत प्रा. डॉ. अनंत राऊत हे गुरु रविदास यांच्या विचारांचे भारतीय संविधानात उमटलेले प्रतिबिंब : एक आकलन या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. डी. निटुरकर हे होते. तर उदघाटक म्हणून सेवा निवृत्त सेल्स टॅक्स निरीक्षक डी. एस. सूर्यवंशी होते. तसेच श्रीमती महानंदा शेवाळे, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे, नरशिंग घोडके, इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा. यू. डी. गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अनंत राऊत म्हणाले, आपणास गुलाम करणारी, अस्पृश्य आणि दारिद्र्यात ठेवणारी व्यवस्था गुरु रविदासानी नाकारली. आपणासही ही प्रतीक्रांतीकारी व्यवस्था नाकारता आली पाहिजे. भारतीय संविधानाच्या १५ व्या अनुच्छेदमध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, जन्मस्थान या पैकी कोणत्याही कारणावरून भेदाभेद करता येणार नाही. असे सांगितले आहे. सरळ सरळ हा गुरु रविदासांच्या विचारांचा प्रभाव आहे. येत्या काळात संविधान जागृतीपर कार्यक्रम घ्यावे लागतील. एक व्यापक अभियान प्रत्येक शाळा-महाविद्यालय घ्यावे लागेल. सामाजिक परिवर्तनासाठी प्रचंड काम करावे लागेल. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रारंभी प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे यांनी आपल्या प्रस्ताविकात प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. आणि आमचे तथाकतिथ नेते मनुवादी पक्ष, नेत्यांच्या गळ्यात गळा घालतात. हे तमाम दलित, बहुजनाना खटकलं पाहिजे. असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.आर.डी. निटुरकर यांनी सांगितले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरावर संविधान निर्माण करताना त्यांच्यावर सर्व सुधारक, संतांच्या विचारांचा पगडा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'अनटचेबल' हा ग्रंथ संत रविदास यांना अर्पण केलेला आहे. असे सांगून लोकशाही, संविधान जिवंत ठेवण्यासाठी आपण सर्वांनी सजग राहिले पाहिजे, असे सांगितले. या कार्यक्रमाला लातूर शहरातील बुद्धीजीवी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यू.डी.गायकवाड यांनी केले. तर आभार रावणराजे आत्राम यांनी मानले.

ज्येष्ठ समाजवादी नेते मनवेल तुस्कानो अमृतमहोत्सव संपन्न

विकास करताना स्थानिकांचा आधी विचार झाला पाहिजे

सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले यांचे प्रतिपादन

वसई/प्रतिनिधी

कुठल्याही प्रदेशात विकास करताना स्थानिक जनतेचा, संस्कृतीचा आणि त्यांच्या मूलभूत गरजांचा विचार केला पाहिजे. शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचे सुराज्य स्थापन करताना आधी रयतेच्या हिताचा विचार केला. अशाप्रकारचे सुराज्य स्थापन करण्यासाठी जी निवडक मंडळी धडपडत आहेत. त्यापैकी मनवेल तुस्कानो एक आहेत. जनहिताचे प्रश्न बाजूला सारून कुठल्याही मार्गाने सत्तेवर राहण्यासाठी सत्तांतर, पक्षफोडी अशा कुरापतींना प्राधान्य देण्याची पद्धत रूढ होत असताना तत्त्वासाठी लढणारे माणूसप्रेमी व साधे सरळ जगणारी माणसं आता दुरापास्त होत आहेत, असे गौरवोद्गार सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले यांनी मनवेल तुस्कानो अमृतमहोत्सवी गौरव सोहळ्यात बोलतांना काढले. विरार पश्चिमेला नंदाखाल गावी बुधवारी सायंकाळी संपन्न झालेल्या मनवेल तुस्कानो अमृतमहोत्सवी गौरव सोहळा समिती आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सदर कार्यक्रमावेळी मनवेल तुस्कानो ह्यांचा जीवनपट उलगडून दाखविणारा 'यज्ञ व समिधा' हा गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. ...पान ६ वर

देवणी येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

देवणी/प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त तालुकास्तरीय जयंती समिती यांच्याकडून भव्य मिरवणुकीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. देवणी येथील विवेक वर्धिनी शैक्षणिक संकुलात शिवजयंती निमित्त सर्व समाजाच्या राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेचे, पालखीचे पूजन करण्यात आले. नंतर देवणी तालुका शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष भगवानराव पाटील तळेगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, माँ जिजाऊ, बसवेश्वर, संभाजी राजे यांचे पूजन सिद्धलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा डॉ.सौ. कीर्तीताई संजय घोरपडे, अण्णाराव पाटील, तहसीलदार सोमनाथ वाडकर, गटविकास अधिकारी सागर वरांडेकर, साह्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके, सोमनाथ लुळे, काशिनाथ गरिबे, मनोहर पटणे, जावेद तांबोळी, अनिल कांबळे, देविदास पतंगे, नागेश जिवणे, वैजनाथ अष्टूरे, किशोर निडवंचे, अनिल इंगोले, रमेश मन्सुरे नगरसेविका भाग्यलक्ष्मी रेवण मळभगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यानंतर शहराच्या प्रमुख मार्गावरून शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक वाजत गाजत आतिषबाजी, फुलाची उधळण करीत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी ठिकठिकाणी शिवाजी महाराजांचे पोवाडे, गीत, जय भवानी. जय शिवाजी जयघोषणात करीत आपले नृत्य सादर केले. यानंतर ही मिरवणूक संकुलात ...पान ६ वर

पालघर जिल्हा परिषद येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



पालघर/प्रतिनिधी

आज १९ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद पालघर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच सर्व उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. शिवाजी शहाजी भोसले (१९ फेब्रुवारी, १६३० – ३ एप्रिल १६८०), छत्रपती शिवाजी महाराज म्हणून प्रसिद्ध, हे एक भारतीय राजे आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. विजापूरच्या ढासळत्या आदिलशाहीमधून शिवरायांनी स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करून मराठा साम्राज्याची स्थापना केली. इ.स. १६७४ मध्ये रायगड किल्ल्यावर औपचारिकपणे छत्रपती म्हणून त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरी केली जाते. अशा थोर महापुरुषाची जयंती आज जिल्हा परिषदेत साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल उपस्थित त्यांना विस्तृत माहिती दिली. यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) शेषराव बडे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा राजेश पाध्ये, सहा. आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत साळुंखे, जिल्हा कृषी अधिकारी, तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

विरारमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



विरार/प्रतिनिधी

राजा छत्रपती शिवाजी चौक विरार पश्चिम येथे सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून सुरू झालेल्या या शिवजयंती ऊत्सवामध्ये शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोवाडे शिवगर्जना आदींनी येथील वातावरण शिवमय झाले होते. शिवरायांचा लढा हा मानवतेच्या हक्कासाठी व न्यायासाठी होता. या इथला शेतकरी वर्ग, महिला वर्ग व समाजातील सर्व घटकांना अभय मिळवून देण्यासाठी ते लढले व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे थोर चरित्र हे आपल्या सर्वांसाठी महान आदर्श आहे असे प्रतिपादन यावेळी आपल्या मनोगतातून प्रथम महापौर राजीव पाटील यांनी केले. या समारंभाला माजी नगरसेवक अजीव पाटील व माजी नगरसेवक विलासबंधू चोरघे, माजी नगरसेवक हार्दिक राऊत, माजी नगरसेविका व नगराध्यक्षा कांताबाई पाटील, माजी नगरसेविका सिमा काळे, माजी नगरसेविका सुरेखा कुरकुरे, माजी सभापती नगरसेवक सखाराम महाडिक, माजी नगरसेवक नयन जैन, राजेश बक्षी, भुषण चुरी, महानगरपालिका सहाय्यक आयुक्त श्रीम. काळे मॅडम, के पी पाटील विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवृंद आणि नागरिक उपस्थित होते.